
# श्रीसाईलीला



जून किं. ५० न पैसे १९६७

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे


सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईंतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर** टे. नं. २९६३१

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



# श्री साई वाक्सुधा

जो जिज्ञासू असतो व जो आत्म्याच्या शोधांत सतत असतो, ज्यांचें त्यासाठीं सतत तपश्चरण चालू असतें, त्यापायीं वाट्यास येतील त्या हालअपेष्टा व यातना जो सोशीत असतो त्याच्यावरच आत्मारामाची कृपा होत असते. आत्म्याला त्याची दया येते. व तो त्याला आत्मदर्शन घडवितो. त्यासाठीं प्रथम श्रवण—मनन करावें लागतें, भावनारहित व्हावें लागतें, भेदाभेद पार गळावे लागतात तेव्हांच आत्मारामाच्या भेटीचा मार्ग सांपडूं शकतो. प्रपंच म्हणजे सारा अज्ञानाचा पसारा आहे. अज्ञानामुळें आम्हीं त्याला चिकटून राहिलों आहोंत. तें अज्ञान पटल दूर सारून आम्हीं ज्ञानमार्गानें वाटचाल करूं लागलें पाहिजे.

—श्रीसाईसच्चरित्

# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] जून १९६४ [ अंक ४ था

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

**************

गेल्या महिन्यांत श्रीसाईबाबांच्या शिर्डीत एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना घडून आली. जनतेचें दुःख नाहींसें करण्याच्या व रुग्णाईतांस औषध पाणी देऊन किंवा अन्य उपाययोजना करून त्यांना दुःखमुक्त करणें हा त्या घटनेचा मूलभूत उद्देश होता. ती शिर्डीच्या दृष्टीनें व त्या गांवांतील त्याचप्रमाणें आसपासच्या भागां-तील दुःखपीडित जनतेच्या दृष्टीनें महत्त्वाची घटना म्हणजे श्रीसाईनाथ हॉस्पिटलचें मोठ्या समारोहानें करण्यांत आलेलें उद्‌घाटन होय.

स्त्री असो, पुरुष असो वा मूल असो. त्यांच्यामागें नाना प्रकारच्या रोगांचें शुक्लकाष्ट लागलेलें असतें. व्याधी म्हणजे ती तापदायक असावयाचीच. तिच्यापासून सुटका झाली आहे असा माणूस सांपडणें कठीण. आजारीपणांत माणसाचें जीवन दुःखदायक होत असतें. दुःखकष्ट कोणाला हवे असतात ? परंतु माणसाच्या वाट्याला ते येत असतात. त्यावर उपाय म्हणजे औषधोपचार. खेड्यापाड्यांतील लोकांना दारिद्र्यामुळें योग्यवेळीं योग्य उपचार व औषधपाणी मिळणें किती कठीण जात असतें याचें वर्णन करून सांगायला नको.

दुसऱ्यांचें दुःख, मग तें कोणत्याहि स्वरूपाचें असो, तें दूर करून माणसाला सुखी करणें हा बाबांचा एक धर्म होता. रुग्णाईताच्या सेवेला व त्याच्या दुःखविमो-चनाला बाबा अग्रपूजेचा मान देत असत. त्यच्यासाठीं परोपरीनें झटत असत. स्वतःच्या आचरणानें रुग्णसेवेचा उच्च आदर्श बाबांनीं सर्वांपुढें ठेविला आहे. रुग्णाची, दुःखपीडितांची व रंजल्या गांजलेल्यांची सेवा म्हणजे खरीखुरी देवपूजा अशा प्रकारचा पूजेचा सर्वोच्च आदर्श त्यांनीं जगापुढें ठेवला आहे.

आम्हांला साईबाबांना प्रसन्न करून घ्यायचें आहे. साईबाबांची कृपादृष्टि आमच्याकडे वळवून घ्यायची आहे. ती कोणत्या मार्गानें गेलें असतां वळेल ! उत्तर अगदीं सुस्पष्ट आहे. त्यांना ज्या गोष्टी आवडत असत त्यानीं आपल्यापुढें रुग्णसेवेच्या रूपानें जो मार्ग ठेविला त्या मार्गानें गेलें असतां बाबांची कृपा संपादन करतां येईल, हें उघड आहे.

वर सांगितल्याप्रमाणें खेड्यापाड्यांतील लोकांच्या मार्गांत अनंत अडचणी असतात. आळंतपण आलें, कोणी पुरुष, स्त्री किंवा मूल आजारी झालें तर किती धांवपळ व चिंता करावी लागते ! उपचार करणारे डॉक्टर किंवा जेथें गेलें असतां घरच्याप्रमाणें सोय होईल असें इस्पितळ खेड्यांत कुठून असणार ? नशिबानें जगावें किंवा मरावें.

हरितळाची सुखसोय पाहिजे असल्यास कुठेंतरी दूर अंतरावर जावें लागतें. तेथें जागेच्या अभावीं सोय होईल किंवा नाहीं याबद्दल शंकाच. अशा स्थितींत खेड्यांत रहाणाऱ्यांची भारी कुचंबणा होत असते.

शिर्डींत बाबांचें वास्तव्य घडलें, त्यांच्या वास्तव्यानें तो गांव व आसपासचा परिसर पुण्यपावन झाला. त्या भागांत तरी रोगराईचें दुःख कमी असावें, त्यावर जरूर ती उपाययोजना व्हावी व बाबांचें जें उच्च उद्दिष्ट होतें तें साध्य व्हावें या हेतूनें सुमारें दोन वर्षांपूर्वी शिर्डी येथें हॉस्पिटलचा कोनशीला समारंभ त्यावेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे हस्तें झाला.

गेलीं दोन वर्षे या हॉस्पिटलचें बांधकाम, डॉक्टरांसाठीं परिचारिकांसाठीं त्याचप्रमाणें नोकरवर्गासाठीं निवासस्थानें बांधण्यांत आली असून त्यांपैकीं कांहीं इमारती अद्याप पूर्ण व्हावयाच्या आहेत.

मे महिन्याच्या १४ तारखेस या हॉस्पिटलचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटांत पार पडला. समारंभाचा वृत्तांत या अंकीं देण्यांत आलेला आहे त्यावरून त्याच्या एकंदर भव्यतेची वाचकांस कल्पना करतां येईल.

ज्ञानदान व रुग्णोपचार ह्या मानवी जीवनाच्या दोन अत्यंत आवश्यक गरजा आहेत. जेथें या दोन्हींचा अभाव आहे तेथें जीवन कष्टदायक होऊन रहात असतें. साईबाबांच्या कृपेनें व त्यांच्या प्रेरणेनें शिर्डींत आतां या दोन्ही मानवी गरजा उत्तम प्रकारें भागविण्यांत आल्या आहेत. शिर्डीचा विकास झपाट्यानें होत आहे. जो गांव बाबांच्या वास्तव्यानें पुण्यपावन झाला त्या गांवाचा विकास चौफेर व विचारपूर्वक होत जावा, हें योग्यच होय. मानवी जीवन सुसह्य व सुकर व्हावें, यासाठीं शिर्डी संस्थानचे कारभारी मनोभावें झटत आहेत ही सारी बाबांची प्रेरणा आहे.

या हॉस्पिटलसाठीं आतांपर्यंत एकंदर खर्च सुमारें चार साडे चार लक्ष रुपयांपर्यंत झाला असावा. अजूनही ८।१० लक्ष रुपये, हॉस्पिटल सर्व प्रकारें सुसज्ज व अद्ययावत् करण्यासाठीं खर्च करावे लागतील. ज्यांनीं हें कार्य आतांपर्यंत यशस्वी रीतीनें पार पाडविलें ते बाबाच त्याची पूर्णता घडवून आणतील हें निश्चित होय.

शिर्डी येथील श्रीसाईनाथ हॉस्पिटल थोड्याच कालावधींत नांवारूपास येईल. ज्या उद्देशानें त्याची स्थापना करण्यांत आली तो उद्देश उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणांत सफल होत असल्याचें दिसून येईल अशी अपेक्षा करण्यास भरपूर वाव आहे. या हॉस्पिटलच्या निर्मितीला जशी बाबांची प्रेरणा कारणीभूत झाली त्याचप्रमाणें बाबांच्या अनेक भक्तांचा सक्रिय सहकार या लोकोपयोगी कार्याला लाभलेला आहे.

रुग्णसेवेचें कार्य म्हणजे बाबांचें कार्य. तें पार पाडण्यासाठीं स्थापन झालेल्या संस्थेला यापुढील काळांत वाढता आश्रय मिळत जावयाचा आहे. सेवाभावी अशा निरनिराळ्या क्षेत्रांतील तज्ञ डॉक्टरांनीं आठवड्यांतून कांहीं ठराविक तास आपल्या बहुमोल ज्ञानाचा फायदा ह्या हॉस्पिटलमध्यें दाखल होणाऱ्या रुग्णाईतांस देण्याचें ठरविलें आहे ही खरोखर महत्त्वाची घटना आहे.

सध्यां या हॉस्पिटलमध्यें वीस ते चौवीस खाटांची सोय करण्यांत आलेली असली तरी यापुढील काळांत त्यांची वाढ जरूरीप्रमाणें होऊं शकेल अशी व्यवस्था करण्यांत आली आहे.

उद्‌घाटक मंत्रीमहाशय ना. वानखेडे यांनीं आपल्या भाषणांत ध्वनित केल्याप्रमाणें, हॉस्पिटलकडे धांव घेणाऱ्या रोग्यांची संख्या वाढत न जातां ती उत्तरोत्तर घटत जावो ही सद्भावना ठीक आहे. रोगराईची व आजाराची कृपा कोणावरहि होऊं नये. सर्वांना संपूर्ण आरोग्य व निरामयता लाभावी ही आमची इच्छा कितीही बलवत्तर असली तरी ती फळास मात्र येऊं शकत नाहीं. त्यासाठीं इस्पितळांची जरूरी भासते.

कसेंही असो. श्रीसाईनाथ हॉस्पिटल या संस्थेचा भविष्यकाळ उज्वल आहे. शिर्डीतिल ही लोकोपयोगी संस्था अहंमद नगर जिल्ह्यांतच नव्हे तर अखिल महाराष्ट्रांत उत्तम प्रकारचा नांवलौकिक संपादन करील अशी आम्हांला खात्री वाटते. श्रीसाईनाथांच्या कृपेनें ही इच्छा सफल होवो हीच आमची प्रार्थना आहे.

—संपादक


॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

**※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※**

# श्री साईनाथ हॉस्पिटलचा भव्य उद्‌घाटन समारंभ

( आमच्या खास प्रतिनिधीकडून )

**" आपल्या देशांत माणसांची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली आहे परंतु त्याचबरोबर माणुसकीची वाढ न होतां तिचा ऱ्हास होत चालला आहे. त्यामुळें जनतेच्या वाढत्या गरजा भागविणें कठीण झालें आहे. जनतेला सद्वर्तनाचें शिक्षण देण्यासाठीं एखादी मोहिम सुरू करण्याची जरूरी भासूं लागली आहे. साईबाबा या भूमींत अवतरले ते सर्वांना माणुसकीनें वागण्याचा संदेश देण्यासाठींच. "**

**—ना. शेषराव वानखेडे**

शिर्डी येथें श्रीसाईबाबांच्या प्रेरणेनें व शिर्डी संस्थानच्या आणि ठिकठिकाणच्या अनेक भक्तांच्या सहकार्यानें बांधण्यांत आलेल्या श्रीसाईनाथ हॉस्पिटलचा उद्‌घाटन समारंभ गुरुवार ता. १४ मे रोजीं सकाळीं दहा वाजतां महाराष्ट्र राज्याचे अर्थमंत्री ना. शेषराव वानखेडे यांच्या हस्तें, सुप्रीम कोर्टाचे जज्ज ना. न्या. जे. आर. मुधोळकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठया थाटानें व अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला.

या समारंभासाठीं हॉस्पिटलच्या भव्य इमारतीसमोर सुंदर व प्रशस्त मंडप घालण्यांत येऊन तो लतापल्लवांनीं सुशोभीत करण्यांत आला होता. अध्यक्ष, उद्‌घाटक व निमंत्रित बडे पाहूणे यांच्यासाठीं उच्च व्यासपीठ उभारण्यांत आलें होतें. सकाळीं आठ वाजतां श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची शृंगारलेल्या रथातून वाजत गाजत मंडपापर्यंत मिरवणूक काढून त्या प्रतिमेची स्थापना व्यासपीठावर करण्यांत आली. मंडपांत लोकांची ये, जा एकसारखी सुरू होती. दहा वाजण्याच्या सुमारास सर्व मंडप चिक्कार भरून गेला.

**स्वागतपर भाषण**

बड्या पाहुण्यांचें आगमन झालें. ते आपआपल्या बैठकीवर विराजमान झाले. आणि स्वागतपर मधूर गीत गायनानें समारंभाची सुरुवात झाली. त्यानंतर कामचलाऊ चॅरिटी कमिशनर श्री. त्रिलोकेकर यांनीं स्वागतपर भाषणांत अध्यक्ष व उद्‌घाटक यांचा परिचय करून दिला. ते म्हणाले, आज खरोखर सोनियाचा दिवस आहे. श्रीसाईबाबा समाधिस्थ होऊन पंचेचाळीस वर्षांचा काळ मागें पडला. परंतु त्यांनीं जी तत्त्वें आचरणांत आणिलीं व ज्यांची त्यांनीं सर्वांना शिकवण दिलीं तीं तत्त्वें अमर व बहुमोलाचीं आहेत. मानवसेवा हीच देवसेवा हें त्यांचें एक महान् तत्व होतें व

त्याचें पालन करण्यासाठीं, दुःखी रुग्णाईत व गोरगरिब यांची सेवा घडावी या सदहेतूनें या पुण्यभूमींत श्रीसाईनाथ हॉस्पिटल बांधण्यांत आलें. जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥ अशा वर्गातील साईबाबा होते. अशा रंजलेल्या गांजलेल्या साठीं या संस्थेचें आज उद्‌घाटन व्हावयाचें आहे. रंक असो, राव असो, सर्वांना सेवेची जरूरी असते. साईबाबावर जे जे निष्ठा ठेवतात त्यांचा दुःखभार हलका होतो. ' तूं माझ्याकडे पहा, म्हणजे मी तुझ्याकडे पाहीन व तुझा दुःखभार हलका करीन ' असें त्यांनीं सांगून ठेविलें आहे व त्याची प्रचीति प्रत्येकास येत आहे. श्रद्धेचें सामर्थ्य फार मोठें असतें. ज्याच्याजवळ तें बळ आहे त्या बळावर तो वाटेल ती कर्तबगारी करूं शकतो. पूर्वींचे या संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क्षीरसागर यांच्या कारकीर्दीत या कार्याचा भक्कम पाया घालण्यांत आला व आतां सध्याचे कोर्ट रिसीव्हर श्री. दर्प यांच्या कारकीर्दीत हॉस्पिटलचें उद्‌घाटन होण्याचा सुयोग जुळून आलेला आहे.नाना प्रकाच्या अडचणी सोसून आपण येथें आलांत व आमच्या आजच्या आनंदांत सहभागी झालांत याबद्दल मी आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों.

यानंतर अध्यक्ष न्या. मुधोळकर व उद्‌घाटक ना. शेषराव वानखेडे यांचा थोडक्यांत परिचय करून देऊन त्यानी आपलें भाषण संपविलें.

**मार्गदर्शक डॉ. केतकर**

श्रीसाईनाथ हॉस्पिटलशीं एक मार्गदर्शक व हितचिंतक या नात्यानें आरंभापासून निकट संबंध असलेले डॉ. जी. व्ही. केतकर यांनीं आपल्या भाषणांत हॉस्पिटलची थोडक्यांत माहिती करून दिली,ते म्हणाले शिर्डी संस्थानच्या इतिहासांत आजची घटना हा एक सुंदर व चिरस्मरणींय प्रसंग आहे. साईबाबांच्या पुण्याईनें या गावाचें वैभव उत्तरोत्तर वाढत चाललें आहे व त्या वैभवश्रींत आज ज्याचें उदघाटन होणार आहे त्या साईनाथ हॉस्पिटलनें अभूतपूर्व भर घातली आहे. साईबाबांचें लक्ष गोरगरीब व रूग्णाईत यांच्याकडे नेहमी फार मोठया प्रमाणांत लागून राहिलेलें असे. रूग्णांची सेवा हा त्यांचा एक धर्म होता. शिक्षण व आरोग्यरक्षण या मानवी जीवनांतील फार महत्त्वाच्या व अत्यावश्यक गरजा आहेत. या पुण्यभूमींत शिक्षण प्रसाराची सोय यापूर्वी झालेली आहे; परंतु रूग्णाईतांची सेवा व्यापक व मोठया प्रमाणांत व्हावयाची होती. तीही आतां होत आहे. येथें पूर्वीपासून एक मोफत दवाखाना डॉ. गुजराथी यांच्या नेतृत्वाखाली चालू आहेच. रूग्णाईतांच्या सेवेच्या व वाढत्या गरजांच्या दृष्टीनें नवीन हॉस्पिटलचा उपयोग या भागांतील लोकांना आतां विशेष प्रमणांत होणार आहे. या हॉस्पिटलच्या उभारणीचें कार्य गेल्या सुमारें दोन वर्षांपासून चालू आहे. सध्यांचे कोर्ट रिसिव्हर श्री. दर्प यानीं हें कार्य उत्तम प्रकारें पार पडावें यासाठीं आटोकाट मेहनत घेतलेली आहे. त्यांना अनेक निष्ठावंत सहाय्यकर्ते लाभले. अनेकांच्या गोड सहकाराचे फळ आज आपण पहांत आहोंत. निरनिराळ्या रोगांवरील तज्ञ अशा अनेक

डॉक्टरांचें सहकार्य या हॉस्पिटलला लाभणार आहे. साईबाबांच्या प्रेरणेने अनेकांची सेवा लाभणार आहे ही संतोषाची गोष्ट होय. गोरगरीब, व रोगानें पिडलेल्या असहाय्य लोकांना या संस्थेचा जसा लाभ होणार आहे तसाच, श्रीमंतांनाही होणार आहे. मात्र श्रीमंतांनीं देणग्यांच्या रूपानें हॉस्पिटलच्या समृद्धीकडे कृपा करून लक्ष पुरवावें अशी विनंती आहे. परदेशांतून येथें मोठमोठे व तज्ञ डॉक्टर येतात व आपल्या ज्ञानाचा आणि सेवाभावाचा लाभ आमच्या लोकाना देतात. मग आमच्या तज्ञांनीं त्यांचा कित्ता कां बरें गिरवूं नये? खेड्यापाड्यांतून वैद्यकीय मदत अत्यंत अपुरी पडत आहे. जितकीं इस्पितळें व दवाखाने निघतील तेवढे थोडेच आहेत. श्रीसाईनाथ हॉस्पीटलमुळें या भागांतील जनतेची फार मोठी अडचण दूर होणार आहे. अशा या उपयुक्त संस्थेला सेवाभावी कार्यकर्ते लाभोत व तिची उत्तरोत्तर भरभराट होत जावो असें मी इच्छीतों.

## उद्‌घाटक ना. वानखेडे

यानंतर समारंभाध्यक्ष ना. न्या. मुधोळकर यांनीं अर्थमंत्री ना. वानखेडे यांस हॉस्पिटलचें उद्‌घाटन करण्याची विनंती केली.

उद्‌घाटनापूर्वी केलेल्या भाषणांत ना. वानखेडे म्हणाले, मी उद्‌घाटणाचें आमंत्रण स्वीकारलें खरें परंतु कालपर्यंत या हॉस्पिटलमधील पहिला पेशंट म्हणून नांव नोंदण्याची पाळी माझ्यावर येते कीं काय असें वाटूं लागलें होतें. परंतु काल सायंकाळपासून बाबांच्या कृपेने मला बरें वाटूं लागलें. व त्यामुळें मी आपल्यापुढें उभा आहे. शिरडी संस्थानतर्फे लोककल्याणाच्या दृष्टीनें गेल्या कांहीं वर्षांपासून महत्वाची कार्यें पार पाडत असलेली मी पहात आहे. मधून मधून मी येथें येत असतो. खेड्यापाड्यांतील जनतेच्या दृष्टीनें संस्थान चालकांनीं चॅरिटी कमिशनर यांच्या मसलतीनें हा जो उपयुक्त कार्यक्रम आंखला व तो पार पाडून दाखविला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतों. जनसंख्या वाढत चालली आहे. त्याबरोबर तिच्या गरजाहि वाढत आहेत. शिक्षण प्रसार, आरोग्यरक्षण ह्या फार महत्त्वाच्या बाबी आहेत. खेड्यांपाड्यांतून सध्यां नियोजन कार्य त्या दृष्टीनें वाटचाल करूं लागलें आहे. हें कार्य यापुढील २०।२५ वर्षांत पूर्णत्वास आणणें जरूर आहे. त्या दृष्टीनें येथें चाललेले प्रयत्न खरोखर अभिनंदनीय आहेत. खेड्यांतील लोकांच्या मार्गांत किती अडचणी आहेत! पिण्याच्या पाण्याचा प्रश्न घ्या, आज पाण्याच्या पायीं सर्वत्र हाकाटी चालू आहे. ही अडचण दूर व्हावी यासाठीं सरकार आपल्या परीनें प्रयत्न करीत आहे.

## माणुसकी मात्र वाढत नाहीं

खेड्यांतून तसेंच शहरांतून माणसांची संख्या झपाट्यानें वाढत चालली आहे. परंतु त्या प्रमाणांत माणुसकी मात्र वाढत असलेली आढळून येत नाहीं. माणुसकीचा उत्तरोत्तर ऱ्हास होत चालला आहे. माणसांनीं माणसाशीं प्रेमभावानें, बंधुभावानें व

माणुसकीनें वागलें पाहिजे याची अजून आम्हाला जाणीव झालेली नाहीं. जनतेला कसें वागावें, सद्वर्तनी कसें व्हावें याचें शिक्षण देण्यासाठीं एखादी मोहीम सुरू करण्याची वेळ आलेली आहे.

या भूमींत श्रीसाईबाबांसारखीं थोर माणसें जन्माला आलीं ती कशासाठीं? जनतेला माणुसकीचें शिक्षण देण्यासाठीं. त्यांनीं अवतार घेऊन जनकल्याणाच्या दृष्टीनें केलेलें कार्य फार महत्त्वाचें आहे. जेथें जेथें दारिद्र्य आणि अज्ञान आहे तेथे तेथे माणुसकीचा नायनाट झाल्याचें आढळून येतें. यासाठीं त्या दोन गोष्टींचें उच्चाटन करण्याचे जोराचे प्रयत्न झाले पाहिजेत. साईबाबांच्या प्रेरणेनें प्रथम येथें शिक्षण कार्य सुरू झालें व तें उत्तम प्रकारें चालू आहे. आणि आतां ऋग्णाईतांच्या सेवेसाठीं सुसज्ज असें हॉस्पिटल सुरू होत आहे.

**काय चमत्कार आहे पहा!**

लौकरच येथे एक तांत्रिक विद्यालयही सुरूं व्हायचें आहे. जनतेच्या दृष्टीनें तशी सोय होणें जरूर आहे. त्यासाठीं दोन एकर जमीनही घेण्यांत आलेली आहे. बाबांच्या प्रेरणेनें व त्यांच्या आशीर्वादानें ही कामें चालू आहेत. काय चमत्कार आहे पहा! साईबाबांच्या समाधिमंदिरांत एक पेटी ठेवण्यांत आलेली आहे. त्यांत उदार भक्त शक्तीप्रमाणें कांहीं ना कांहीं द्रव्य टाकतात. दर वर्षीतील मार्च महिन्यांत पेटींत जमा होणाऱ्या द्रव्याची सरासरी पाहिली तर ती सरासरीनें पांच ते सहा हजार रुपये भरते. यंदा तांत्रिक विद्यालयासाठी जागा घेणें, त्याचे कागदपत्र करणें वगैरेसाठीं खर्च सुमारे बारा साडे बारा हजार रु. झाला. गेल्या मार्चच्या सुमारास ही गोष्ट घडली. त्या मार्च महिन्यांत पेटींत एकंदर रक्कम किती जमावी? गणतीं करतां ती रक्कम तेरा हजार रुपयांपेक्षां अधिक असल्याचें आढळून आलें! मग या कार्याला बाबांचे आशीर्वाद पूर्णपणें आहेत असें आपण कां समजूं नये? आज परस्पर सहकार्याची अत्यंत जरूरी आहे. तें सहकार्य येथें पहायला मिळतें. सहकार्याशिवाय सारें व्यर्थ आहे. आपण येथें साईबाबापासून प्रेरणा मिळवून जनसेवेचें व बाबांच्या आवडीचें कार्य चालविलें आहे त्याबद्दल येथील सर्व कार्यकर्त्यांचें मी अभिनंदन करतों. साईबाबा हयात असतां जें कार्य व्हावें तसें होऊं शकलें नाहीं तें कार्य आपण त्यांच्या मार्गें नेटानें चालविलें आहे. बाबांच्या आत्म्याला त्यामुळें समाधान वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांचे कृपाशीर्वाद आपल्या पाठीशीं आहेत. कोणतेंही कार्य असो. तें चांगलें व यशस्वी होणें चांगल्या माणसांवर अवलंबून असतें. तशीं माणसें येथें वावरत आहेत ही खरोखर अभिनंदनीय गोष्ट आहे.

कोणतीही चळवळ किंवा कार्य असो. तें प्रामाणिक व निष्ठावंत माणसांमुळें वैभवाप्रत येत असतें. येथील हॉसीटलमध्यें कार्य करणारे कर्मचारी व तज्ञ डॉक्टर निष्ठावान व सेवाभावी असले तर या संस्थेला वैभव प्राप्त होण्यास कितीसा अवधि लागणार आहे? तसे डॉक्टर व कर्मचारी बाबांच्या कृपेनें लाभोत हीच याप्रसंगीं माझी

अपेक्षा आहे. यापुढील काळांत या हॉस्पिटलची उत्तरोत्तर वाढ होत जावो व असंख्य रूग्णाईत येथें येवोत अशी सदिच्छा डॉ. केतकर यानी सद्भावनेनें प्रगट केली आहे. मी मात्र वेगळया अर्थानें त्याविरुद्ध सद्भावना प्रगट करीत आहे. बाबांच्या कृपेनें रोगराई व रुग्णाईत न वाढोत. लोक उत्तरोत्तर अधिकाधिक आरोग्यसंपन्न सुखी व समाधानी होवोत अशीही इच्छा प्रगट करणें अनुचित होणार नाही. हें खरेंच आहे कीं जो माणूस आहे त्याच्यामागें कांहीं ना कांहीं व्याधि हात धुवून लागलेल्याच असतात. त्या दूर करण्यासाठीं झटणें हा मानवधर्म आहे. साईबाबांनीं त्या धर्माचे पालन जीवनभर केलें व तेंच कार्य सुकरतेनें करण्यासाठीं आपण हॉस्पिटल उभारण्याची कल्पना सुमारें दोन वर्षांपूर्वी काढली व ती अंमलांत आणून दाखविली. तिला माझा आरंभापासून थोडा फार हातभार लागला याबद्दल मला आनंद वाटतो. आणि आपल्या सर्वांच्या सहकाराने ती कल्पना मूर्त स्वरूपांत आल्याचे पाहून समाधान होत आहे. अशा या उपयुक्त कार्याचे उद्घाटन करण्यासाठीं आपण मला पाचारण केलें याबद्दल मी आपला फार फार आभारी आहें.

**न्या. मुधोळकर**

याप्रमाणें भाषण झाल्यानंतर नामदार ना. वानखेडे आपल्या सुशील सौभाग्यवती-सह हॉस्पिटलच्या द्वाराकडे वळले व त्यांनीं जरूर तो विधी उरकून हॉस्पिटलचें उद्घाटन वाद्यांच्या व टाळ्यांच्या निनादांत जाहिर केलें.

समारंभाध्यक्ष ना. न्या. मुधोळकर यानंतर आपल्या भाषणांत म्हणाले, साईबाबांचा जन्म लोककल्याणासाठीं झाला. या पुण्यभूमींत जन्म घेऊन त्यांनीं जनतेला शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविला व जनतेच्या कल्याणासाठीं ते जीवनभर झाले. गोर-गरीबांकडे दुःखितांकडे व रुग्णाईताकडे त्यांचें नेहमी लक्ष लागून राहिलेलें असे. त्यांच्या या उद्दिष्टास अनुसरून येथें सतत कार्य चालू आहे. आज ज्या हॉस्पिटलचें अनावरण झालें तें तरी काय त्यांच्याच उद्दिष्टाला अनुसरून ज्यानीं ज्यांनीं साईबाबावर श्रद्धा ठेविली त्यांचे कल्याण झाले आहे. ना. वानखेडे यांचा व माझा पूर्वीपासून परिचय आहे. ते आपलें कार्य उत्तम प्रकारे पार पाडीत आहेत हें पाहून मला संतोष होतो. येथील कार्याकडे न त्यांचे चांगले लक्ष आहे. या हॉस्पिटलशीं संलग्न झालेले कार्यकर्ते व डॉक्टरवर्ग यांच्यावर फार मोठी जबाबदारी आहे. ते ती इमाने-इतबारें पार पाडण्यासाठीं झटतील अशी मी आशा बाळगतों. ही संस्था उत्तरोत्तर अधिकाधिक भरभराटीला येऊन ती जनतेच्या कल्याणाला व उन्नतीला कारणीसूत होवो असें मी इच्छितो. ज्यांच्या कारकिर्दीत हें कार्य यशस्वी रीतीनें पार पडत आहे व त्यासाठीं ज्यानी फार मेहनत घेतली ते येथील कोर्ट रिसिव्हर श्री. दर्पे यांचेंही याप्रसंगीं मी अभिनंदन करतों.

त्यानंतर माजी कोर्ट रिसिव्हर श्री. क्षीरसागर यानीं हॉस्पिटलच्या बाबतींत ज्या कांहीं

मंडळींचा विशेष हातभार लावला त्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या हस्तें त्यांना महावस्त्रें अर्पण करविलीं.

**आभार प्रदर्शन**

नंतर हा उद्‌घाटन समारंभ सर्व प्रकारें यशस्वी रीतीनें पार पडावा यासाठीं विशेषतः गेल्या कांहीं महिन्यापासून जिवापाड मेहनत घेणारे श्री. एस. बाळकृष्ण दर्प (रिसिव्हर) यांनीं समारंभाध्यक्ष, उद्‌घाटक, मार्गदर्शक डॉक्टर्स, कॉंट्रॅक्टर्स, चॅरिटी कमिशनर, ग्रामपंचायतीचे अध्यक्ष व सभासद, तसेंच संस्थानचे व इतर कार्यकर्ते आणि ज्यांचा ज्यांचा या कार्याशीं थोडा फार हातभार लागला त्या सर्वांचे आभार मानले.

शेवटीं वंदेमातरम् व अल्पोपहार होऊन समारंभाची सांगता झाली.

हॉस्पिटलची इमारत, डॉक्टर व परिचारिका यांच्यासाठीं निवासस्थानें तसेंच वैद्यकीय उपकरणें व फर्निचरवगैरेसाठीं सुमारें चार लक्ष रुपये खर्च झाला असून हॉस्पिटलला अद्यावत् स्वरूप देण्यासाठीं व जरूर तेवढें पूर्णत्व आणण्यासाठीं आणखी कांहीं लक्ष रुपये खर्च करावे लागतील. परंतु श्रीसाईबाबांच्या कृपेनें यापुढील काळांत हें हॉस्पिटल शिर्डीला किंवा नगर जिल्ह्यालाच नव्हे तर अखिल महाराष्ट्राला ललामभूत होईल अशी आशा बाळगण्यास जागा आहे.


## लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. **जयकर ब्रदर्स**, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं.** — दवाबझार, मुंबई २.

# मी व माझे अस्तित्व.

लेखांक १० वा

लेखकः—केशव कृष्ण प्रधान

महापुरुषांच्या सान्निध्यांतील क्षण न क्षण बहूमोलाचे असतात. श्री साईबाबा नेहमीं म्हणत असत कीं कासवी पलीकडील तीरावरून नुसत्या प्रेमळ दृष्टीक्षेपांनी अलीकडील तीरावरील आपल्या पोरांचे संवर्धन व पालनपोषण करते. महापुरुषांना दृष्टीक्षेपाची सुद्धां जरूरी नसते. त्यांच्या केवळ इच्छामागें ज्ञानसागररूप—प्रत्यक्षच ज्ञानसागर असें ते कोणत्याही मानवी अंतःकरणांत प्रवेश करून त्या ठिकाणीं दुसऱ्या ज्ञानांचा सागर निर्माण करतात. याचा अनुभव मला आतांपर्यंत पूर्णपणें आला होता. परंतु त्या ज्ञानसागराची रुंदी, उंची, खोली ह्याचे वर्णन करण्यास मात्र मी असमर्थ होतों.मानवानें निर्माण केलेली ज्ञानाची बहुविध दालनें म्हणजे केवळ खऱ्या ज्ञानाच्या प्राप्तीमधील अडचणी किंवा अडथळे असा माझा समज असल्याकारणानें महापुरुषापासून प्रत्यक्ष शब्दानें किंवा प्रत्यक्ष त्याच्या सहवासामुळे प्राप्त झालेले ज्ञान हेंच मला आतापर्यंत खरें व बहूमोलाचें ज्ञान वाटत असे. आणि हें माझें म्हणणे बहूतांशी खरें आहे असे सुरवातीला वाटणें साहजिकच आहे. तें तेवढेसे खरें नाही, असे जेव्हा मला त्या महापुरूषापासून कळले तेव्हा मी पण थोडासा आश्चर्यचकीत झालों. व म्हणूनच मी माझा महापुरुषाबरोबर झालेला संवाद वाचकांच्या माहितीसाठी सादर करीत आहे.

मानवाच्या शरीराचा, बुद्धीचा, आत्म्याचा परस्पर संबंध काय हें विशद करून सांगण्यासाठीं जगांतील सर्व मौलीक व अतींद्रीय शास्त्रें धडपड करीत आहेत. विश्वाची सर्व उभारणी सत् चित् व आनंद या त्रयीवर—या तीनतत्वावर अधिष्टीत आहे. त्यामधील चित् म्हणजे एनर्जी—या एका स्वरूपाच्या मागे आज युगे न युगे विज्ञानशास्त्र लागले आहे. आनंद म्हणजे भावना, ह्या अतींद्रिय तत्वाच्या शोधार्थ मानसशास्त्र, व सत् म्हणजे बुद्धी यामागें वेदांतशास्त्र लागले आहे. परमेश्वराची सर्व तिन्ही स्वरूपें मानवाला एकाच वेळेला अनुभवास येण्यास सर्व शास्त्रांचा परीपाक एकत्र होणें आवश्यक आहे. योग म्हणजे कांहीं विशिष्ट तऱ्हेनें परमेश्वराशी युत होऊन त्याचा अनुभव घेणे. व म्हणूनच या त्रयींचा अनुभव ज्यांत येतो तें सर्व श्रेष्ठ शास्त्र 'योग' हें आहे. महापुरुषाच्या सान्निध्यात ह्या सच्चितानंद त्रयींचा बीज स्वरुपांत अनुभव येऊन दिवसेन् दिवस ह्या बीजांतून ज्ञानवृक्षाची परिणती होऊं लागते. तेव्हां साहाजिकच असा अनुभवी शिष्य त्या स्वसंवेद्य अनुभव ज्ञानाचा आदि अंत स्वविचारानें शोधण्याचा प्रयत्न करूं

लागतो. व त्या दिव्य ज्ञानाचा वैचारिक परिपोषार्थ सर्व आधिभौतिक विज्ञान ग्रंथ, तत्व विषयक ग्रंथ, वगैरेंचे परिक्षण करूं लागतो.

आधुनिक युगांत, मानवीं मनांवर विज्ञानाची पकड जबरदस्त असणें साहाजीक आहे. शास्त्रज्ञांच्या प्रयोग शाळेत, परिक्षानळीत जर परमेश्वर पकडता येऊन सर्वांस दाखविता आला तरच त्याचे अस्तित्व मानण्यास आजचा मानव तयार आहे. नाहींतर त्यावर विचार करण्याची सुद्धां त्याला फुरसत नाही. परमेश्वराच्या सत्—चित् आनंद या तीन स्वरूपांतील चित् हे स्वरूपच फक्त आज प्रयोग शाळेंत उत्तम तऱ्हेनें विशद झाले आहे. एवढी तरी सुदैवाची गोष्ट आहे. व त्या विषयींचे सिद्धांत आज मितीला जवळ जवळ पक्के ठरवून गेल्यासारखे दिसतात. अणूविश्लेषणांत आज शास्त्रज्ञांनाचा ( Physicist ) प्रोटान्स, इलेक्ट्रान्स, व न्यूट्रान्स यांच्या परस्पर संबंधात प्रकाशाचा दिव्य अनुभव येत आहे. व माध्यमाविना पृथ्वीतलावर अणूरेणूमधून संचार करणारा हा प्रकाश सूर्यचंद्राच्याही मागून सतत येत असावा हे कॉस्मीक किरण दाखवितात. ह्यावरुन God said let there be light and there was light ह्या बायबल मधील अगदी सुरवातीच्या वाक्यामागील परमेश्वराचे अस्तित्व सिद्ध होऊं पहात आहे. रसायन शास्त्रज्ञाच्यामतें विश्वाची निर्मिति विद्युतमय जड अणूमधून झाली असून जगांतील सर्व घन, द्रव किंवा वायुरूप द्रवे एकमेकांत रूपांतर होऊन सुद्धां शेवटी तितकींच रहातात. व त्यामधील अविनाशी चित् तत्वामुळें नाश पावत नाहीं. हें शास्त्रिय सत्य जगापुढें मांडून शास्त्रज्ञ परमेश्वराचे अस्तित्वच दर्शवित आहेत. सूर्य आणि पृथ्वी ह्यांचे अनेक संबंध विद्युत व चुंबक शास्त्राप्रमाणें Positive and Negative Polarization चे असून त्याचप्रमाणें मानवाचा आत्मा व त्याचे शरीर यांतील परस्पर परिणाम याच तत्वाप्रमाणें असले पाहिजेत, असेंच पर्यायानें सुचवित आहेत. शरीर शास्त्रज्ञ मानवाच्या शरीराचे स्वास्थ्य निव्वळ त्याचे शरीरातील निरनिराळ्या शारीरीक भागावर अवलंबून नसून प्राप्त असलेल्या निरनिराळ्या ग्रंथींच्या परस्पर स्त्रावाच्या प्रमाणावर विषेशतः अवलंबून आहे हें मान्य करूं लागले आहेत. याचा विचार केल्यास योगशास्त्रांत परमेश्वर प्राप्ती करतां नमूद केलेल्या प्राण,अपानाच्या प्रक्रिया, यावरच ते भर देत आहेत. कारण कं त्याच प्रक्रियावर मानवी शरीरांतील ग्रंथीच्या स्त्रवांतील समप्रमाणता बसविली आहे. जीवशास्त्रज्ञ ( Biologyist ) अलीकडे Matter is life- building process at lower stage असें म्हणून मातीला सुद्धां जीवंतपणा देऊ पहात आहेत. आणि एका तऱ्हेने अणूरेणू मध्यें सुद्धां परमेश्वर आहे हें विधान सत्य करू पहात आहेत. या सर्व शास्त्रांनी परमेश्वराची चित् शक्ति अविनाशी आहे, हा एक मुखानें दिलासा दिला आहे. परंतु परमेश्वर नुसता चित् नसून तो सत् व आनंद सुद्धां आहे असें योगी अनुभवानें म्हणतात. त्यातील आनंद हा भाग भावनात्मक असल्यामुळें त्यावद्दल ही आधिभौतीक शास्त्रे काय म्हणतात तें पाहू. आपल्या

शरीरांत तीन प्रकारच्या नर्व्हस सिस्टीमस आहेत. त्यांतील पहिली व महत्वाची म्हणजे Spinal nerve system मनुष्याच्या स्वेच्छेनें केलेला सर्व क्रिया या व्यवस्थेच्या द्वारे घडतात. उदा. बोलणे, चालणे इत्यादि. दुसरी नर्व्हस सिस्टीम पहिल्या नर्व्हस सिस्टीमला कांहीं विशिष्ट धाग्यांनी (Ranies) युत केलेली आहे. हिला Sympathetic nervous system म्हणतात. हिचें कार्य मानवांत नकळत चालतें. उदा० शरीरांतील हृदय, फुफ्फुसे यांच्या क्रिया अहोरात्र चालविणें. ह्याच नर्व सिस्टीमच्या कांहीं क्रिया Para sympathetic nerve सिस्टीमकडे दिल्या आहेत. ह्या दुसऱ्या नर्व्ह सिस्टीमच्या सर्व प्रक्रिया ज्या एका विशिष्ट भागांतून विषेशतः प्रस्तुत होतात त्याला Solar plexus असें म्हणतात. व या solar plexus असें म्हणतात. व या Solar plexus चा संबंध माणसाच्या भावनात्मक संस्कृतीशी फार आहे, असे आधुनिक वैद्यक शास्त्राचें म्हणणें आहे. मनुष्याला झालेल्या शारीरीक विकृतींत शरीरापेक्षां मनांचा भाग जास्त असतो. किंबहुना मनांचे रोगांच्या जंतूवर प्रक्रिया करण्याचे बल कमी झाल्यास रोग फोफावतो. हा सिद्धान्तच होऊन बसला आहे ह्या Plexus चे गुणधर्म श्री. अरविंदांच्या सायकिक बीइंग सारखे असल्या-मुळें अध्यात्मिक उन्नतींत याचे महत्व योग्यांना विशेष वाटत असल्यास नवल नाही. तसेच आपल्या जठराग्नीचे आंत एक पोटांचा मेंदू (Abdomial Brain) असून त्यातील द्रव्यें डोक्यांतील मेंदूसारखी Grey and white आहेत व तो विचार करूं शकतो, हे म्हणणे सुद्धां वैद्यकीयशास्त्र मान्य करण्याच्या बेतांत आहेत अमक्याची स्थिति पाहून माझ्या पोटांत कालवेल. पोटांत माझ्या विषयीं माया आहे वगैरे विधानें ह्याच भावनात्मक मेंदूची निदर्शक नव्हेत काय? यावरून परमेश्वराची Feeling Side म्हणजेच आनंद स्वरूप, शास्त्रीय आधारावर बसविण्यास योग्यांना कांहींच प्रत्यय वाटत नाही, यात आश्चर्य तें काय?

परमेश्वर हा ज्ञानमय आहे. किंबहुना तो कळणे म्हणजेच खरे खुरे ज्ञान याचा अर्थ God is Knowledge and knowedge is God. परमेश्वराच्या अस्तित्वाचा अणुरेणूमध्ये पुरेपूर अनुभव येणे म्हणजेच ज्ञानी होणे. तो अनुभव जो पर्यंत पूर्णपणें आला नाही तोपर्यंतची स्थिति ही कांहीं प्रमाणांत अज्ञानाची स्थिति आहे. खरे म्हणजे ज्ञान व अज्ञान ह्या दोनच स्थिति आहेत. अज्ञानाचे पूर्ण निरसन म्हणजेच ज्ञान. तेव्हा ज्ञान ही कांहीं वेगळी स्थिति नाहीं. ज्ञान हे प्रत्यक्ष परमेश्वरच असल्यामुळें ते होते–आहे–व असणार. ते जन्माला येत नाही ते मरत नाही. ते अविनाशी असून त्याविरूद्ध जें अज्ञान तें नाहीच आहे. ते केव्हांही नव्हते–नाही व नसणार हाच अर्थ श्री साईबाबांनी नानासाहेब चांदोरकर यांस गीतेंतल्या खालील श्लोकांचा अर्थ सांगताना विशद केला.:—

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्व दर्शिनः

हा वृत्तांत श्रीसाईसत्चरीत्रात दिलेला आहे. शेवटच्या ओळींत 'ज्ञानिनस्तत्व-दर्शिनः ह्या ठिकाणीं ज्ञानशद्बाच्या मागे अवग्रह चिन्ह दाखविण्याचा श्रीसाईबाबांचा हाच उद्देश होता. भगवान् श्रीकृष्णानीं अर्जूनाला सर्व गीता सांगितल्यावर अर्जुनानें मला ज्ञान झाले असें न म्हणता माझा मोह दिगंतीं गेला हे उत्तर दिले आहे. मानवाच्या शरीरात चैतन्य हें सतत अहोरात्र खेळतच असतें. त्याच्या मृत्यु-नंतर तेंच चैतन्य कांहीं निराळ्या देहांत जाऊन अस्तित्वांत ग्हात असलेंच पाहिजे. हे एक परीनें आमची आधिभैातीक शास्त्रे देखील कबूल करतात. All Matter is energy. Energy is Indestructible and remains for ever in one form or other प्रश्न एवढाच आहे की मनुष्याच्या मृत्युनंतर त्याच्या भावनांचे व बुद्धीचे किंबहूना ज्याला आपण Personality म्हणतो त्याचे काय होते? मृत्युनंतर भावनांची व विचारांची व इतर गोष्टींची मानवामधील जी ठेवण आहे ती तंतोतंत नाश न पावतां तशीच रहाते किंवा थोडया फार फरकानें पूर्वजन्मींचा तो मीच ही निदान ओळख पटण्याइतकी तरी कोणत्याही रूपांतरीत अवस्थेंत अस्तित्वांत असते किंवा नाही, याचा शोध आधीभैातीक शास्त्रांना लागणार नाही. उद्यांच्या जगांत जर मानसशास्त्र किंवा योगशास्त्र याचे प्रयोग आधिभौतीक शास्त्रांच्या पायावर करून दाखविण्याइतकी जर कांहीं यंत्रे निघाली तर मात्र सांगता येत नाही. तोपर्यंत समूळ अज्ञानांचा निरास म्हणजेच पूर्ण ज्ञान, म्हणजेच ईश्वराच्या अस्तित्वाविषयीचा अनुभव. हे सर्व अनु-भवजन्यच रहाणार. आणि तों पर्यंत 'येन विज्ञानेन सर्वं विज्ञातुमूभवति'। असें ज्याचे वर्णन आहे तो इश्वरी साक्षात्कार मानवाला तर्कात तरी उतरवतां येईल किंवा नाही याची शंका वाटते. तरी देखील हें पूर्णज्ञान मानवाला प्राप्त करून देण्यास त्याच्या शरीरचनेत कांहीं इंद्रीयाकरवीही व्यवस्था केली आहे कीं काय हें पाहूं. मनुष्याच्या शरीरात्रा मनाचा व बुद्धीचा म्हणजे कर्म भक्ति आणि ज्ञान या त्रयींचा समन्वय निदर्शीत करणारी कांहीं इंद्रिये प्रामुख्यानें मानवाच्या शरीरांत आहेत असे योग्य-शास्त्र मानते. आपल्या शरीराचा आपल्या मनांशी संबंध अतिशय सूक्ष्म अशा हजारो नाड्यांनी जोडलेला आहे, योगशास्त्राप्रमाणें ह्या नाड्या ७२००० आहेत. ह्या नाड्या वैद्यकीयशास्त्राला मनुष्याच्या शरीरात पहावयास सुद्धां मिळत नाहींत. याचें कारण त्या अतिशय सूक्ष्म असून त्यांचा संबंध मानवांच्या आधिभौतीक देहाच्या आंत जो एक वासना देह आहे त्याच्याशी आहे असें योग्यशास्त्र मानते. व त्यामुळें त्यांचा समावेश Spinal Nerve System किंवा Sympathetic Nerve System किंवा para Sympathetic Nerue System यामध्ये होत नाही. या सर्व नाड्या गुदद्वाराच्या चार आंगूळे वर पाठीच्या कण्याखाली एकत्रीत होतात. त्या जागेला योग्यशास्त्रानें कंद असें नांव दिले आहे. या कंदाचा संबंध त्याच्या अगदी नजीक पोटाच्या खोलीत एक Abdominal Brain

( पोटाचा मेंदू ) आहे त्याच्याशी आहे. हा मेंदू भावानात्मक विचार करतो. व त्यामध्ये आपल्या डोक्यातील मेंदूप्रमाणें Grey and white matter आहे हें वर सांगितले आहेच. या मेंदूचा संबंध मानवाच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या नानाविध भावनात्मक विचारांशी आहे. किंबहुना आपल्या मनांची ठेवण याच मेंदूवर होणाऱ्या परिणामाचा परिपाक आहे. याच मेंदूतून या सर्व नाड्या त्याच्या वर कांहीं अंतरावर असलेल्या सोलर Plexus किंवा सूर्यकमळाला मिळतात. वर सांगितल्याप्रमाणें या सोलर. Plexus ना श्रीअरविंद बाबू सायकीक बिईंग म्हणत असत असें वाटतें. हे सूर्यकमळ म्हणजेच Solar Plexus, sympathetic nerve system चे केंद्रस्थान असून त्याचा संबंध Spinal nervous system शी कांहीं सूक्ष्म धाग्यांनी बांधला आहे. त्याला Ramies ( रेमीज ) असें म्हणतात. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे ह्या सोलर plexus च्या ठिकाणी मनुष्याच्या बुद्धि आणि भावनांचा फार सुंदर समन्वय होतो. कारण हे सोलर plexus एका बाजूनी भावनात्मक मेंदूशी म्हणजे Abdominal brain शी व एका बाजूनें मानवांच्या डोक्यातील मेंदूशीं जोडलेलें आहे. योगशास्त्राप्रमाणे मानवाची योगीक प्रगती सद्विचार सद्भावनांनी जास्त किंवा कमी होणे हे एका दृष्टीनें या सूर्य कमळाच्या विकासावर आहे. किंवा असेंही म्हणता येईल की मानवाच्या सद्भावनांचा व सद्विचारांचा परिणाम ह्या सूर्यकमळाच्या विकासास कारणीभूत आहे. थोडक्यांत या दोघांचा एकमेकावर अशा तऱ्हेनें परिणाम होतो. कर्म भक्ति व ज्ञान म्हणजे शरीर बुद्धि व मन यांचा समन्वय होणे म्हणजे सत् चित् आनंद या त्रयोंचा अननभूत मिलाफ होणें याच मिलाफांत योग्यांनी वर्णिलेल्या परमेश्वराचें अस्तित्व पूर्णज्ञान स्वरुपात मानवाला दिसतें. 'ज्ञानात् एव तु कैवल्यं' म्हणजेच ज्ञानं एव कैवल्यं असें म्हणावयास पाहिजे. कारण Knowledge is Power, knowledge is love, knowledge is yogic illumination या श्रुतीवाक्याचा पुरेपूर अनुभव योग्याला ह्या स्थितीत होतो. आधी भौतीक शास्त्रांनी वर्णन केलेली एनर्जी, भावना, व बुद्धि याच ठिकाणी पूर्ण बिलसीत होते व 'सर्वं खलु इदं ब्रम्ह' असे उद्गार योग्याच्या मुखांतून या अनुभवासारखे बाहेर पडतात. अणूरेणूना व्यापून शेष उरलेला परमेश्वर योग्याच्या नसानसांतून या अनुभवासारखा नाचूं लागतो. व जग हा भास असून परमेश्वर हें एकच सत्य आहे, याचा पुरेपूर पडताळा त्याला येतो. यालाच पूर्णज्ञान व पूर्ण अज्ञान निरास म्हणतात.

वरील अनुभव येण्यास नानातऱ्हेचे मार्ग योग शास्त्रानें सांगितले आहेत. उदाहरणार्थ, मंत्रयोग, तपयोग, राजयोग, कुंडलीनी योग इत्यादि. त्यातील कुंडलीनी योगाचा संबंध माणसाच्या शरीर रचनेशी सर्वांत जास्त येतो. याबद्दलची माहिती या पूर्वीच्या एका लेखांत येऊन गेली आहे. आंता थोडा मंत्र योगाचा विचार करूं. मंत्रयोग हा

नादब्रम्हावर बसविला आहे. सृष्टीची उत्पत्ति करण्यापूर्वी परमेश्वरानें 'एकोऽहं बहुस्याम्' असा संकल्प केला त्यास वेदशास्त्रांत आदि संकल्प असें म्हणतात. हा आदि संकल्प एखादा मनुष्य स्वतःशी मोठयानें बोलतो. अशाच तऱ्हेनें होतो असे म्हणू या. फार तर हा संकल्प ॐ कार रूपानें नादमय झाला. व त्यामधून नादाची व शब्दांची निर्मीति झाली व ती निर्मीती परा, पश्यन्ती, मध्यमा, व वैखरी या वर्णिलेल्या चार वाण्यामधून वैखरी या साकार स्वरूपांत आपल्याला प्रतीत झाली. व त्याच क्रियेवर हुकूम जगांची निर्मीती होऊन तो संकल्प साकार झाला. आदि मंत्र ॐ ह्यात सुद्धा अ–उ–म ह्यात पृथ्वीची उत्पत्ती स्थिती व लय ह्या तीन अवस्थांचाच क्रम आहे. अ म्हणजे उत्पत्ती. उ म्हणजे स्थिति व म म्हणजे लय. मानव हा परमेश्वराची प्रतिकृति आहे असें बायबलमध्यें म्हटले आहे. (God made man in his own image) ह्या वाक्याचा अर्थ हाच आहे व म्हणून मानवाची शब्दसृष्टी अशाच तऱ्हेनें निर्माण होते. शब्द पहिला. प्रथम आत्मस्वरूपामधून परावाणी म्हणजे मानवाच्या बुद्धीत उतरतो. नंतर जें कांहीं बोलावयाचे आहे त्याचा अर्थ मनांमध्यें पश्यन्ती स्वरूपाचा वाणीमध्यें त्याला आपल्या आंत स्पष्ट दिसतो. व नंतर तो शरीराच्या माध्यमांतून म्हणजे Vocal cord मधून मेंदूच्या संवेदनेनें वैखरीच्या रूपानें तोंडातून बाहेर पडून साकार होतो. जरी मानवाची सर्व शब्दसृष्टी अशा तऱ्हेनें निर्मीत झाली असली तरी देखील त्यांतील कांहीं शब्द ह्या परा, पश्यन्ती, मध्यमा, व वैखारी ह्या वाण्यांमधून होणाऱ्या व मानवाला न कळणाऱ्या दिव्य संवेदनेतून निर्माण होतात. असें म्हणतात कीं योग्यांची ईडा व पिंगळा मधील सुषुम्ना नाडी जी थेट ब्रम्हरंध्रापर्यंत जाऊन भिडते व त्यास अतिंद्रीय ज्ञान देते, त्या नाडीतून निर्माण होणारी वाणी योग्याच्या मुखांतून स्त्रवणारा त्या अमृत ओघाने भोवतालच्या मानवांत अमृतनिर्मीती करूं शकतो. आमच्या आद्यऋषींना हें तत्व माहीत असल्यामुळें त्यांनी कांहीं अमृतवायी शब्द निर्माण केले. त्यासच आपण मंत्र असे म्हणतो. मंत्र म्हणजे मनाला तारणारे ते मन तारयते इति मंत्र। या मंत्रांचा मननाने किंवा उच्चारानें प्राणायामांत वर्णन केलेल्या श्वासोश्वासाच्या पान अपान विषयक क्रिया, आपोआप तालबद्ध स्वरूपांत होऊ शकतात. मंत्रयोगाविषयी ह्या ठिकाणी माहीती देण्याचे कारण असें की या शब्दोच्चारानें Abdominal brain व सोलर plexus म्हणजेच पोटातींल मेंदू व सूर्य कमळ ह्यांचाही विकास होतो. व शरीरांतील सर्व नस एका नादब्रम्हानें घुमूं लागतात. परंतु हा अनुभव येण्यास कित्येक वर्षे मंत्रजप करावा लागतो म्हणून साधकाने मनबुद्धीमागे जाऊन परमात्म स्वरूपांत सतत वास करणाऱ्या महापुरुषांच्या मुखांतून स्त्रवणाऱ्या अमृतवाणीत स्वतःला बुडवून घ्यावे, म्हणजे ह्या क्रिया सहज होऊं लागतात. आपल्याकडील सर्व पौर्वात्य संगीत ह्या नाद ब्रम्हावर बसविले आहे. स्वर, आलाप, राग, रागीण्या ह्या ॐ या नादब्रम्हाच्या पायावर उभारलेल्या आहेत. महापुरुषांचे भाषण 'तो स्वभावे जे जे बोले ते ते ब्रम्ह निरुपण' असे असून त्याच्या मुखांतून स्त्रवणारी भक्ती गीते साधकाला

# श्री. शंकराचार्यांचें पुण्यस्मरण

**********************

## मातेची समजूत कशी घातली ?

**श्री आदि शंकराचार्यांची जयंती गेल्या महिन्यांत येऊन गेली. ते वेदांचे, वैदिक कार्याचे अर्थात अद्वैताचे महान् प्रचारक होते. ते शंकराचा अवतार होते असें मानण्यांत येतें. वेदांत धर्माच्या प्रचारासाठीं त्यांचा अवतार झाला व पांखड पंतांचें खंडन करून व भारतभर विजयी दौरा काढून तसेंच जरूर तेथें मठांची किंवा आदिपीठांची स्थापना करू वयाच्या अवघ्या बत्तीसाव्या वर्षी त्यानीं आपल्या अलौकिक अवतारकार्याची समाप्ति केली. त्यांची माता त्यानीं सन्यासधर्माची दीक्षा घेण्याविरूद्ध होती; परंतु तिची समजूत त्यानीं कशी घातली ती कथा पुढें देण्यांत आली आहे.**

अशा या शंकराचा जन्म एका अत्यंत कुलीन व पवित्र घराण्यांत झाला. त्यांच्या वडिलांचें नाव होतें शिवगुरू व आईचें नांव होतें आर्यंबा. वडील वयाच्या तिस या वर्षीच निवर्तले व या बालकाचें संगोपन करण्याची सारी जबाबदारी मातेवर येऊन पडली व ती तिनें उत्तम प्रकारें पार पाडिली. शंकराचा उपनयन विधि पार पडल्यानंतर त्याला सन्यास धर्माची दीक्षा घेऊन घराबाहेर पडावें असें वाटूं लागलें. लोककल्याणासाठीं य धर्मरक्षणासाठीं तर त्यांचा अवतार होता. मग त्यानीं घरीं बसून रहावें कसें ? आईचा एकुलता एक व लाडका मुलगा ! त्याला आपल्या नजरेसमोर वाढवावा, लहानाचा मोठा व कर्तबगार करावा, त्याला शिक्षण द्यावें व त्याचें लग्नकार्य करून त्याचा चालता संसार डोळे भरून पहावा ही आईची इच्छा ! कोणत्या आईची तशी इच्छा असत नाहीं ?

परंतु ईश्वरी इच्छा वेगळीच होती. तीच शेवटीं सफल व्हायची. मुलाचें लक्ष सन्यासाकडे होतें. ती दैवी संपदा बरोबर घेऊनच तें मूल जन्माला आलें

---

अमृत सागरांत त्वरीत बुडवितात. हा अनुभव मला त्या महापुरुषांच्या सहवासात आला. व माझ्या नसानसातून कायमचें दिव्य संगीत सुरू झालें. त्या महासंगीतातून स्मरणारें अतींद्रीय ज्ञान मी ह्या लेखांच्याद्वारें आपणास त्याचा थोडा अनुभव देण्याचा प्रयत्न केला आहे

**( पुढील अंकी समाप्त )**

************

होते. आईचा कल स्वाभाविकपणें त्याविरूद्ध होता. मग यांतून मार्ग कसा काढायचा ?

त्यांच्या घरापासून जवळच एक नदी वहात जात होती. एके दिवशीं शंकर आपल्या आईला म्हणाला, "चल! आपण नदीवर स्नानासाठीं जाऊं व स्नान करून परत येऊं."

बाळाची इच्छा! ती पूर्ण केली पाहिजे. मातापुत्र नदीवर स्नानासाठीं गेलीं. आईनें प्रथम स्नान केलें व ती पाण्यांतून नदीच्या काठावर आली. व शंकरनें पाण्यांत बुडी मारली. तो कांहीं वेळानें वर आला तो मोठमोठ्यानें किंकाळत!

विचारी आई घाबरीघुबरी झाली. शंकर दोन्हीं हात पुढें करून "मला वाचवा! मला वाचवा" म्हणून आक्रंदन करीत होता. एका सुसरीनें त्यावर हल्ला करुन ती त्याच्या पायांना पाण्यांत खेचीत होती. तें दृश्य किती भीषण व हृदयद्रावक होतें! आणि तें आईनें आपल्या डोळयांनीं पहायचें! असहाय्य स्थितींत ती आई सैरावैरा नाचत होती.

एकुलता एक लाडका मुलगा आणि तो सुसरीच्या जबड्यात सांपडलेला, ती त्याला कधीं गिळंकृत करील याचा नेम नव्हता. मातेवर कोसळलेला तो केवढा मोठा दुर्धर प्रसंग होता! आईनें आशा सोडली! सुसरीनें कधी कोणावर दया-माया केली आहे कां?

अशा त्या भीषण व निराशेच्या प्रसंगीं करूणस्वरानें आईला हांक मारून शंकरानें एक निर्वाणीचा उपाय सुचविला. तो आईला म्हणाला "आई! अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. मार्ग आहे. तुझी मरणोत्तर क्रिया माझ्या हातून व्हावी हीच ना तुझी इच्छा आहे? मी जिवंत राहिलों आणि कुठेंही असलों, तरी तुझें क्रियाकर्म धांवत येऊन यथासांग करीन. त्याबद्दल निर्धास्त रहा. मला संन्यासधर्म स्वीकारण्याची तेवढी परवानगी दे; म्हणजे या मगरमिठींतून माझी सुटका होईल; अन्यथा होणार नाहीं!"

आईनें पाहिलें कीं आपला मुलगा जिवंत राहिला तर सारें. मग तो घेईना का संन्यासदीक्षा! मगर मिठींतून सुटका होणें हीच गोष्ट महत्वाची. मरण कीं संन्यास हे दोन मार्ग तिच्यापुढें होते. विचार करून मरणापेक्षां संन्यास घेऊन जिवंत रहाण्याचा मार्ग सहाजिकच तिला ग्राह्य वाटला व तोच तिनें पत्करला.

अशा रीतीनें शंकरानें त्या प्रसंगांतून स्वतःची सहीसलामत एकदांची सुटका करून घेतली. शंकरानें त्यावेळी जरूर तो मंत्र उच्चारून सुसरीच्या जबड्यातून स्वतःची सुटका करून घेतली. तो जिवंतपणीं पाण्याबाहेर आला आणि आईला कडकडून भेटला!

आतां शंकर आईचा व घरादाराचा त्याग करून संन्यासी होणार होता. केवळ भिक्षांदेहीवर भटकत रहाणार होता. भटकण्यासाठीं, वेदान्तधर्माचा प्रचार करण्यासाठीं तर त्याचा अवतार होता.

त्यावेळीं आई म्हणाली होती, "माझ्या लाडक्या! तुला माझ्या नजरेखालीं वाढवावा, शिक्षणसंपन्न करावा, तुझें लग्न करून द्यावें व तुझा वाढता संसार पहावा हीच माझी एकमेव आकांक्षा होती. तूं आतां सन्यासी होणार आणि माझ्या साऱ्या आशा आकांक्षा धुळीला मिळणार! किती मी दुर्भागी!"

शंकरानें नंतर आईची समजूत घालण्याचा प्रयत्न परोपरीनें केला. तो म्हणाला "जें घडायचें तें कोणालाही टाळतां येणार नाहीं. ही भगवंताची इच्छा आहे. साऱ्या जगाचा कारभार त्याच्या तंत्रानुसार चाललेला आहे. आई, तूं कांहीं काळजी करूं नकोस! आतांपर्यंत मी तुझा एकटीचा मुलगा होतों. यापुढें जगांतील सर्व मातांचा मी मुलगा होईन. जगांतील सर्व मातापुत्रांची मी काळजी वाहीन. माझे सारे शिष्य माझे पुत्र होतील. देवाचें चिंतन करीत असतां मला जी असीम शांतता मिळेल ती शांती माझी पत्नी होऊन राहील. तेव्हां या साऱ्या गोष्टींचा विचार करून तूं मला हें घर सोडून जाण्याचा व त्रिभुवनाला माझें घर करण्याची मला परवानगी दे! मोह सोडून मोकळी हो. तोच तुझ्या माझ्या शाश्वत कल्याणाचा एकमेव मार्ग आहे."

आर्यंबा (आई) शंकराकडे तटस्थतेनें पहात राहिली. तिच्या नेत्रावाटे अश्रु-प्रवाह सारखा चालू होता. तिच्या मुखावाटे शब्द बाहेर पडत नव्हता. तरीही स्फुदस्फुंदत असतां म्हणाली, "बाळा माझे सारें बोलणें तूं खुंटवून टाकलेंस. मला बोलायला जागाच राहिली नाहीं. सन्यास घेऊन तूं आतां येथून निघून जाशील! तुझ्या गैरहजेरींत एक दिवस यमराज येऊन मला घेऊन जाईल. मग माझें अखेरचें क्रियाकर्म कोण बरें करणार? मला सद्गति कशी मिळणार? तुझा भार वाहून तुला जन्म देऊन काय बरें उपयोग?"

"आई! तूं त्याची चिंता मुळींच करूं नकोस। ती चिंता मला मृत्यूसमयीं तूं माझी आठवण कर आणि मी तुझ्या उशाशीं हजर आहें म्हणून समज! माझ्या या शब्दांवर विश्वास ठेव. मी त्यावेळीं तुला खचित अंतर देणार नाहीं. पुत्र-कर्तव्यांत माझ्याकडून कदापि कसूर होणार नाहीं.

त्यानंतर वर्षांमागून वर्षे गेलीं. शंकर आता शंकराचार्य पदाला पोहोंचले. भारत-भर धांवता दौरा काढून त्यानीं वेदान्त धर्माचा व अद्वैताचा कसून प्रसार केला. हजारो शिष्य केले. जागोजाग आदिपीठांची स्थापना केली.

ते शृंगेरी येथील मठांत असतां मातेची मृत्यू घटिका जवळ आल्याची त्यांना जाणीव झाली. ते आपला शिष्य परिवार सोडून आपल्या प्रिय मातेच्या दर्शनासाठीं

# ईश्वरसंबंधीं ज्ञानाचें महत्त्व

ईश्वर सर्वांसाठीं आपले बाहू पसरून त्यांना प्रेमालिंगान द्यायला तयार आहे; परंतु आम्हीं भक्तिभावानें व निर्मळ अंतःकरणानें त्याची आठवण केली पाहिजे—त्याला आळविलें पाहिजे. तुम्हीं केव्हां आपल्याकडे येतां याची तो उत्कंठेनें वाट पहात आहे.

" इहैव सन्तोऽथ विद्मस्तद्वयं न चेदवेदिर्महती विनष्टिः ।

य एतद्विदुरमृतास्ते भवन्ति अथेतरे दुःखमेवापि यान्ति "

या स्थलीं राहूनच आम्हीं त्या परमेश्वरास जाणतो. जर आम्हीं त्यास जाणिलें नसतें, तर आम्हांस महत्संकट प्राप्त होऊन आमचा सर्वप्रकारें नाश झाला असता. तसें झाल्यानें आमची काय दशा झाली असती ? आपला संसार अज्ञानांधकारानें किती बरें व्याप्त झाला असता ! आम्हीं या ठिकाणीं दुःखानें व संकटानें व्याप्त झाल्यामुळें कोठेंहि आम्हांस विश्रांतीचें स्थान प्राप्त झालें नसतें. येथील आमच्या अंतगत व बाह्य शत्रूंच्या बाणांनीं आमची अंतःकरणें घायाळ होऊन आम्हांस कशापासूनहीं शांति प्राप्त झाली नसती. तसें झाल्यामुळें

---

धांवत आले. आर्यंबा त्यांना पहातांच आनंदानें बेहोष झाली. प्रिय पुत्रानें आपला शब्द शेवटीं पालन केला. अंतकाळीं, प्रिय पुत्रानें आपलें वचन पाळलें याचाच तिला आनंद झाला. त्यावेळीं आईच्या उशीजवळ बसून शंकराचार्यांनीं विष्णु भुजंग स्तोत्राची रचना करून तें म्हटलें. उद्देश अंतसमयीं मातेला भगवंताचें दर्शन घडावें व तिनें पुण्य-पावन व्हावें. नारायणाचें दर्शन घडतांच नारायण ! नारायण ! ! म्हणत तिनें प्राण सोडला ! !

त्यानंतर शंकराचार्यांनीं विधीपूर्वक मातेच्या शवाला अग्नी देऊन जे जे संस्कार करणें जरूर होतें ते सर्व संस्कार यथाविधी पार पाडले. संन्याशाला तशाप्रकारचा अधिकार नाहीं असा विरोध तत्कालीन पुरोहित वर्गाकडून झाला. परंतु त्या सर्व विरोधाला श्रीशंकराचार्य पुरून उरले. त्यानीं त्यांना सडेतोड उत्तर देऊन शास्त्राधार पूर्वक त्यांचीं तोंडें बंद केली.

असे होते आद्य श्रीशंकराचार्य. त्यांच्या पुण्यस्फूर्तीस आमची सहस्रशः वंदनें.

आप्पाराव.

आमचा आत्मा संसारतापानें निरंतर संतप्त झाला असता, व त्याचा प्रतिकार करण्याचा कोणताही उपाय राहिला नसता. असा प्रकार झाला असतां आमचें जीवन आम्हांस किती दुःसह झालें असतें ? परंतु ईश्वराचा आम्हांवर केवढा अनुग्रह आहे बरें ! तो आमच्या अंतःकरणास शांति प्राप्त व्हावी एतदर्थ आपण स्वतां प्रकट होऊन आमच्या शोकभारानें विदीर्ण झालेल्या अंतःकरणास विश्रांति देतो. याक्षणीं तो प्रत्यक्ष प्रकट झाला आहे. याक्षणीं आम्ही त्याच्या छायेखालीं राहून आमच्या अंतःकरणांतील सर्व शोक ताप विसरून गेलों आहों. याप्रकारें जेव्हां त्याच्या अमृतस्वरूपाचा सहवास आपणास घडतो तेव्हां त्या सहवासाचें फल तत्काळ प्राप्त होतें. हें प्रत्यक्ष फल; याची वाट पहावी लागत नाहीं. याक्षणीं चोहोंकडून आम्हांस आनंद प्राप्त होत आहे. त्याच्या-उपासनेचें फल उपासना करितांनाच प्राप्त होतें. तें फल पुढें होईल अशी वाट पहावी लागत नाहीं. तो जसा प्रत्यक्ष प्रकट होतो, तसेंच तो प्रत्यक्ष फलही देतो. अनंतकालपर्यंत त्याची उपासना करण्याची जी आपली आशा असते ती तो प्रतिक्षणीं पूर्ण करितो. प्रतिक्षणीं ही आशा विशेष उज्वल होते. आम्ही या मर्त्यलोकीं राहून असे मलीन असून, तत्सहवासजनित आनंदाचा लाभ जर प्राप्त करून घेऊं शकतो, तर जसजसें आपण क्रमानें पवित्र होऊन उच्च लोकांहून उच्चतर लोकांत गमन करूं, तसतसे निश्चयपूर्वक तत्सहवासजनित आनंदाचा अधिकाधिक उपभोग घेऊं शकूं यांत संशय काय ? यापासून असा विश्वास दृढ होतो कीं उत्तरोत्तर त्याचा सोज्ज्वल प्रकाश आम्हांस पाहातां येईल, आम्ही निरंतर त्याच्या सहवासांत राहूं, आणि कधींही त्याचा सहवास आपल्यास सुटणार नाहीं.

या स्थानीं राहून जर आम्हीं त्यास जाणलें नसतें, तर आपला मोठा नाश झाला असता. येथील या सर्व विषयजन्य सुखांत बद्ध होऊन राहिल्यानें आम्ही जरेनें जीर्ण होऊन गेलों असतों. मृत्यूच्या वेळेस कोणतीही आशा किंवा भरंवसा राहिला नसता. या ठिकाणीं आम्हांस बंदीवानां-प्रमाणें अंधारांत दिवस घालवावे लागले असते. थोडी देखील आशा किंवा भरवसा राहिला नसता. या ठिकाणीं आह्मांस बंदिवानाप्रमाणें अंधारांत दिवस घालवावे लागले असते. थोडी देखील आशा आमच्या अंतःकरणांत राहिली नसती. अरेरे ! आम्हीं जर त्याला जाणलें नसतें तर आमचा मोठा नाश झाला असता, परंतु पहा ईश्वराची केवढी करुणा ! या ठिकाणी आम्हांस आपल्या समागमाचा तो लाभ देतो, आणि आमच्या अंतःकरणांत आशा उपन्न करितो कीं आम्हांस अनंतकालपर्यंत त्याच्या आनंदाचा उपभोग घेतां येईल. चंद्र नक्षत्रें, पशु, पक्षी त्यास याप्रकारें केव्हांही जाणत नाहींत. चंद्र व तारागण यांचा तो अंतरात्म असून चंद्र व तारागण त्यास जाणत

नाहीं. सर्व निकृष्ट पशूंचें जीवन त्याच्या योगें चालत आहे; त्यापासूनच त्याचें रक्षण होत आहे; ते त्याचे ठायींच वास करीत आहेत. परंतु सिंह, व्याघ, व भालुका इत्यादि महापशु आपापल्या चरितार्थांच्या वस्तु संपादन करण्यांतच निमग्न आहेत; ते आपल्या आश्रयदात्यास जाणत नाहींत. मनुष्याच्या अंतःकरणांत मात्र तो प्रकट होऊन त्यास आपलें दर्शन देतो. महान् पुण्यात्म्याच्या पवित्र अंतःकरणांतच तो प्रकाशमान् होऊन राहतो असें नाहीं; परंतु जे सांसारिक सुखानें उन्मत्त, जे विषयवासनेनें भ्रममाण होऊन एकवेळ देखील त्याचें मनानें चिन्तन करीत नाहींत, त्याच्या मोहरूप मेघानें आच्छादिलेल्या आत्म्यासही आपल्या विद्युत्‌रूप तेजानें तो एकवेळतरी प्रकाशित करितो. साधुजनांच्या सरल व कोमल अंतःकरणांत तर तो प्रवेश करून राहतोच; परंतु सर्व घोर विषयीजनांच्या अंतःकरणांमध्येंही अज्ञानरूपी लोहमय कपाटाचा भेद करून त्यांत प्रवेश करितो. यावरून मनुष्यावर त्याची केवढी अतुल कृपा आहे हें कळतें ! पुण्यात्मा त्याच्या भक्तींत आनंदानें तल्लीन होऊन राहतो. घोर पापीजनहीं नाना क्लेश व संकटें भोगून शेवटीं त्याच्या अंकीं निमग्न राहतात. जे त्यास चिंतीत नाहींत त्यांचेंहीं तो ग्रहण करतो. पवित्र वेळीं कोणासही ईश्वराचें स्मरण झालें असतां त्याच्या नेत्रांतून अश्रु गळतात; व ईश्वराच्या प्रेरणेनें त्याचें चिरजीवन शुद्ध होतें. त्यावेळीं ईश्वराचा भाव त्याच्या अंतःकरणांत चिरस्थायी होतो; ईश्वर या प्रकारें पापी जनांसही आपल्या घरीं घेऊन जातो. तो केवळ अशा समयाचीच इच्छा करितो. तो वाट पाहतो. कीं कोणत्या वेळेस मी त्यांच्या अंतःकरणांत प्रकट झालों असतां ते आपले अंतःकरण मला सादर करतील. कोणत्या वेळेस आपल्या अंकीं बसून ते शांति पावतील. जरी आम्ही त्याचें मनानें चिंतन करित नाहीं, प्रार्थना करीत नाहीं, तथापि त्याला विश्रांति नाहीं. तो सर्वदा वाट पहात असतो कीं कोणत्या वेळेस मला हे जन ग्रहण करितील. तो सर्वांसाठीं बाहू पसरून उभा राहिला आहे.

हे सर्व कृतघ्न मनुष्यांनो ! तुम्हीं काय त्याचे थोडेंदेखील मनानें चिंतन करूं नये ? त्याची याप्रमाणें अतिशय कृपा व प्रीति अवलोकन करून त्याचा एकवार देखील मनानें धन्यवाद करूं नये ? आम्हीं किती मूढ झालों आहों ? तो आम्हांस नेहमी आपल्या अंकीं बसण्यास बोलावीत आहे, पण आम्हीं त्याचें मातृस्नेहयुक्त बोलावणें श्रवण करीत नाहीं. आम्हांस आपल्या मातृजलानें अभिषिक्त करावें हीच त्याची इच्छा आहे. पण इकडे आम्हीं लक्ष देत नाहीं. तो आम्हांवर नित्य प्रीति करितो. आमच्या ठायीं त्याविषयीं इच्छा नाहीं. त्याविषयीं प्रीति नाहीं, यामुळें त्याचें प्रेम आम्हीं संपादन करूं शकत नाहीं. आम्हीं जेव्हां त्याला आपला

आत्मा समर्पण करितो, तेव्हांच तो त्याला पूर्ण करितो. तो मनुष्याचें सौंदर्य परिपूर्ण करितो, तो स्वतः आमच्या स्वाधीन होऊन आमच्या आत्म्यास परिपूर्ण करितो. तो अखंड वाहणारा प्रेमाचा प्रवाह कधींहि शुष्क होत नाहीं. त्यास ग्रहण करण्यास शक्ति जितकी आमच्या ठिकाणीं असेल तितकाच तो आमच्या ठिकाणीं प्रगट होईल.

जरी या ठिकाणीं सर्व त्याचें चिंतन करीत नाहीत तरी तो सर्वांचें चिंतन करितो. तो कोणाचीही उपेक्षा करीत नाहीं. त्याच्या परिवारामध्यें कोणीही बालक निरंतर पतित होऊन राहत नाहीं. कोणी पापी असला, पुण्यात्मा असला, तरी त्या सर्वांस तो आपल्या गृहीं घेऊन जातो; तो सर्वांस आपल्या आलिंगनपाशानें बद्ध करितो. त्याच्या मंगल स्वरूपाच्या ठायीं आमचा या प्रकारचा विश्वास आहे. या पृथ्वींत राहून, ही क्रमानें सर्वांनीं धर्मानें व प्रीतीनें युक्त व्हावें. ईश्वर सर्वांच्या अंतःकरणार अधिकार चालवितो. येथील दुर्गतीची अवस्था क्रमानें नाहींशी होऊन जावी; त्याच्या राज्यांत हा ब्राह्मधर्म व्यापून राहावा; सर्व बंधुभावानें एकत्र होऊन त्यांनीं आपल्या परमपित्याची चरणसेवा करावी; असें झालें असतां सर्व आपलें कल्याण कशानें झालें हें ध्यानांत आणून मन मोकळें करून बोलतील कीं, जर आम्हीं त्यास जाणलें नसतें तर आमचा नाश झाला असता. अशा वेळेस ज्या प्रकारची आमची स्थिति झाली असती, तिचें निरूपण कधींहि करितां येत नाहीं. कोणत्या प्रकारें हें सुखाचें राज्य उदय पावेल ? जेव्हां ईश्वराचें मंगलस्वरूप अंतःकरणांत उदय पावेल, जेव्हां सत्याचे तेज मनाचे ठायीं प्रकाशित होईल, तेव्हां अशा प्रकारचा विश्वास उत्पन्न होईल कीं, पृथ्वींतील सकल लोक ब्रह्मवेत्ते म्हणजे ब्रह्मपरायण होऊन एकांतः करणानें ईश्वराची आराधना करितील. सर्व जण धर्मानें व भक्तीनें वृद्धि पावून त्या एकमात्र पित्याच्या आधीन होऊन त्यास शरणापन्न होऊन राहतील. ईश्वर सर्वही मनुष्यांस कृतार्थ करील. जे त्याच्यासाठीं व्याकुल होतात, त्यांची व्याकुळता तो शांत करील.

काय आश्चर्य! आम्ही या ठिकाणीं राहूनही त्याला जाणतों. हें नियमित क्षुद्र जीवन धारण करीत होत्साते त्या अनंत असीम प्रभूला जाणण्यास अधिकारी होतों. त्याला जाणिलें असतां बाकी दुसरें जाणण्याचें काय राहतें ? "कस्मिन्भगवन्तो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति" हे भगवन् कोणास जाणलें असतां हें सर्व जाणलें जाईल ? या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, त्यास जाणलें असतां सामान्यरूपानें सर्व जाणलें जातें. ज्ञानाचें अन्न सत्य; जो परमेश्वर ती परम वस्तु; ती सत्य वस्तु; तोच एक मात्र ज्ञानाच्या तृप्तीचें स्थल आहे. आसक्तिहीन, प्रशांतचित्त, व जितात्म असे ऋषी त्यास प्राप्त करून घेऊन ज्ञानाच्या योगाने तृप्त झालें. ज्ञान या सकल परिमित

विषयांपासून ईश्वराकडे जाऊन त्याच्या ठायीं विश्वास पावलें नाहीं. तोंपर्यंत त्यापासून शांति प्राप्त होत नाहीं. तें ज्ञान चंचलतेनें व्याकुल होऊन विषयांमध्येंच राहून जाऊन परिभ्रमण करितें. सत्याचें अन्वेषण तो करीत असतो परंतु कोणत्या स्थानींही त्यास खरें सत्य प्राप्त होत नाहीं. सर्व सत्य त्या सत्याची छाया. त्या सत्य स्वरूपास आम्हीं प्राप्त करून घेतलें असतां आम्हीं ज्ञानतृप्त होतों. आमच्या सर्व वासनांची परिसमाप्ति होते. पूर्वकाळीं सर्व ऋषी त्यास त्याचें परमानिधान परमेश्वर यास प्राप्त करून घेऊन असें बोलले आहेत "सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म" "सत्यमेवायतनम्" "सत्यस्य सत्यं" हीं सर्वमहावाक्यें या स्थळीं आपणा सर्वांस प्रतीतें होत आहेत; त्याप्रमाणें सर्वदा त्यांचें उच्चारण झालें म्हणजे पुढेंही सर्वांस तीं प्रतीत होतील. सत्याचा प्रभाव ज्याप्रमाणें पूर्वकाळीं, ज्याप्रमाणें या क्षणीं, त्याचप्रमाणें निरंतरही दिसून येईल. या सर्व भ्रमामध्यें व सर्व अंधकारामध्यें मनुष्याच्या आत्म्यास ठेविलें आहे. सत्याचें बल थोडें जरी असलें तरी तें क्रमाक्रमानें या सर्व पृथ्वीला तेजस्वी करितें. ईश्वर करो कीं निरंतर सर्व ठिकाणींही सत्य प्रसृत होऊन सर्व पृथ्वीला शांती व मंगलभाव यांत निमग्न करो.

———

## श्रीसाई भक्ति गीत

**आज देवा धन्य झालों, मी साईचा दास जाहलो, दास जाहलो ॥ धृ ॥**
**नाहीं केली तीर्थ यात्रा**
**साईसम मज दुजा न त्राता**
**मार्ग माझा भक्तीचारे**
**पावन मी जाहलों, देवा पावन मी जाहलों ॥ १ ॥**
**माई द्वारका माझी आई,**
**ग्रामच शिरडी पाणपोई,**
**साई माझा मज जवळी घेई,**
**देहमनें मी तिथे रंगलो, तिथे रंगलो ॥ २ ॥**
**दुःखातुनि ते कितिक तयाने**
**वांचविले श्रीसाई प्रभुनें**
**स्वयें सोशिलें संकट ज्यानें**
**त्याच कारणें मीहि आतां साईचा जाहलों ॥ ३ ॥**

**—सौ. श्री. पांडुरंग शहाणे**

# आमच्या सोवळ्या ओवळ्याची कल्पना

—संत विनोबा

**भजन आणि भोजन यांची आम्ही जी सांगड घातली आहे ती सोडून देणें जरूर आहे. भजन ही वाहती गंगा आहे. ती पवित्र आहे इतकेंच काय पण ती पावक आहे, दुसऱ्यांना पवित्र करणारी आहे.**

इंद्रियांचीं तोंडें बाहेर आहेत, त्यामुळें त्यांचें पाहणें आंतल्या बाजूस होऊंच शकत नाहीं. डोळ्यांतल्या बाहुलीला बाहेरची दुनिया लख्ख दिसते; पण आंत सगळा अंधार असतो. आंतल्या गुहेचें दर्शन तिला नाहीं. कान बाहेरचे सूर ऐकण्यास सताड उघडे असतात; पण आंतला आवाज ऐकण्याच्या कामीं ते तितकेंच मिटलेले असतात. हा इंद्रियांचा स्वभाव ओळखून शाहणे लोक इंद्रियांच्या पाहण्यावर भरंवसा ठेवीत नाहींत.

पण ज्या लोकांचें मन इंद्रियांच्या मागें धावत असतें त्यांच्या मनालाहि इंद्रियांप्रमाणें बाहेरचें वळण लागतें. आणि एकदां विचार करण्याचेंच इंद्रिय बहिर्मुख बनलें म्हणजे मनुष्याची हालत डोळे असून आंधळा किंवा कान असून बहिरा अशासारखी होऊन बसते. वस्तूचा वरवरचा आकार त्याला दिसतो; पण अंतरंगाला तो पारखा होतो. आजचा आपला समाज बहुतेक अशा जातीचा आहे. त्याचें एकंदर देखणेंच बावरले आहे. त्यामुळें बरें आणि वाईट ह्यांतला फरक समजण्याइतकाहि विवेक त्यांत उरलेला नाहीं.

परवां दिल्लीहून येतांना रस्त्यांत एका माणसाशीं अंत्यजांच्या सवालाविषयीं बोलणें निघालें होतें. त्याचें म्हणणें होतें: “दुसरीकडे तर ठीक आहे, पण देवळांत अंत्यजांचा शिरकाव होणें नीट दिसत नाहीं. देवळांचीं पवित्रता कायम राखलीच पाहिजे.” मीं त्यांना बरेंच समजावून सांगितलें. शेवटीं ते समजले. पण देवळांच्या बाबतींत असाच विचार पुष्कळांच्या मनांत येत असतो. ह्याचें काय कारण? ह्याचें कारण पवित्रतेविषयींची चुकीची कल्पना. ती तरी कशामुळें झाली? जीवनांतून पवित्रता नष्ट झाली आणि पवित्रतेची ‘कल्पना’ करण्याची पाळी आली म्हणून. ही कल्पना करणार कोण? इंद्रियाचा गुलाम बनलेलें मन.

ह्या मनाची पवित्रतेची कल्पना बाह्य स्वच्छतेच्या पलीकडे जात नाही. वास्त-

विक स्वच्छता म्हणजे पवित्रतेच्या ग्रंथाचें बाइंडिंग आहे. स्वच्छतेवरून पवित्रतेचा अंदाज करणें म्हणजे बाइंडिंग पाहून ग्रंथावर अभिप्राय देण्यासारखें आहे. बहुतकरून स्वच्छता आणि पवित्रता जोडीनें जातात हें कांहीं खोटें नाहीं; पण कधीं कधीं ह्यांची जोडी कुस्तीची असते हेंहि विसरून चालणार नाहीं. स्नान केल्यानें शरीर स्वच्छ होतें, शरीर साफ झालें म्हणजें मनांतहि चांगले विचार येण्याचा 'संभव' असतो आणि म्हणून स्नान पवित्र म्हणावयाचें. बाकी स्नानाचा पवित्रतेशीं सरळ संबंध नाहीं. स्वच्छतेच्या जितक्या क्रीया आहेत त्या सर्वांचें असेंच आहे. जोंपर्यंत स्वच्छतेचा पवित्रतेशीं मेळ असतो तोंपर्यंत स्वच्छतेचें म्हणणें ऐकण्यास हरकत नाहीं; नव्हे, ऐकणें जरूर आहे. पण ज्योवेळीं त्यांच्यात मेळ नसतो, किंबहुना उभा दावा सुरू होतो, त्यावेळीं स्वच्छतेला समाधि देऊन पवित्रतेचें समाधान करावें लागतें. अशा प्रसंगीं स्वच्छतेला फाजील ताणून धरणें अधर्म होय.

आईला कॉलरा झाला आहे. रोज पंचवीस पंचवीस वेळ शौचाला होत आहे. तिची सेवा करण्यानें, मी कितीहि काळजी घेतली तरी, थोडाबहुत अस्वच्छ होईन हें उघड आहे. पण म्हणून मी अपवित्र होईन काय? तिची सेवा करण्यानें मी अपवित्र होणार नाहींच; पण उलट सेवा न करण्यानें मी अपवित्र होईन. अशा प्रसंगीं अस्वच्छता पत्करणें हा माझा धर्म नव्हे काय? हें उदाहरण अगदीं टोंकाचें आहे असें कोणास वाटेल. पण स्वच्छता आणि पवित्रता ह्यांच्यांतला संबंध समजण्यास तें उपयुक्त आहे. स्वच्छतेचें इंद्रिय चवचाल करून ठेवल्यानें कसा अनर्थ होऊं शकतो ह्याची कल्पना ह्या उदारणावरून होऊं शकेल.

अंत्यज म्हणजे अस्वच्छ असें कांहीं समिकरण नाहीं. कांहीं अंत्यजांची राहणी अशी पाहिली आहे कीं, त्यांच्या मानानें कित्येक वरिष्ठ वर्गांतल्या लोकांची राहणी ओंगळ म्हणावी लागेल. तुळशीची पूजा करणारे अंत्यज आहेत. नागपूर प्रांतांतून जितके महार पंढरीला जातात, तितके इतर लोक जात नाहींत. ह्यांच्यापैकीं पुष्कळांनीं दारू व मास अजीबात सोडलेलें आहे. एकादशीचा उपवास करणारे पुष्कळ अंत्यज आहेत. माझ्या ओळखीच्या एका अत्यंजानें आपल्या मुलीचें नांव 'एकादशी' ठेवलें आहे, अजामिळानें आपल्या मुलाचें नांव 'नारायण' ठेवलें होते. त्या नांवानें अजामिळ तरल्याची कथा हजारों वर्षें हिंदु-समाज गात आहे. नांवांत संस्कृति लपलेली असतें. 'एकादशी' ह्या नांवांतली संस्कृति किती पवित्र, काव्यमय, संयमशील आहे! ज्या एकादशीची गोष्ट मी सांगत आहें तिनें पंढरीच्या विठोबाचें दर्शन केलें आहे. दर्शन म्हणजे 'दुरून' दर्शन, हें सांगावयास नकोच. कारण, एकादशीला विठोबाच्या मांदिरांत प्रवेश कोठून मिळणार? इतकी थोर संस्कृति ज्या लोकांत आहे,

त्यांना अस्पृश्य मानण्यापेक्षां स्वच्छतेचें इंद्रिय संयमांत राखणें योग्य नव्हे काय ?

बरें, सगळे अंत्यज अस्वच्छ असतात असें मानलें तरी त्याची जबाबदारी बरीचशी उच्च वर्णावरच आहे. त्यांना दूर ठेवल्याचा हा उघड परिणाम आहे. तेव्हां आजही अस्वच्छता दूर करण्याला त्यांना जवळ करणें हेंच साधन आहे. "**लायक व्हा म्हणजे स्वराज्य देऊं**" असें इंग्रज आपणांस म्हणतो. "स्वच्छ व्हा म्हणजे अस्पृश्यता काढून टाकूं." असें आपण अंत्यजांना म्हणतों. ह्या दोन्ही म्हणण्यांत काय फरक आहे ! टिळक म्हणत असत कीं, 'शंभर वर्षें इंग्रजांच्या राज्यांत राहून सुद्धां जर आम्हांला स्वराज्याची लायकी आली नसली तर हा इंग्रजांच्या राज्य करण्याच्या नालायकीचा पुरावा आहे.' तेंच म्हणणें अंत्यजांतर्फे म्हणतां येईल. म्हणून अंत्यजांची अस्वच्छता दूर करण्याची खरी कळकळ वाटत असली तर अस्पृश्यता काढून टाकली पाहिजे.


लोक म्हणतात, " इतरत्र ठीक आहे. पण देवळांत कसे जमणार ? " मी म्हणतो, " इतरत्र जमत नसल्यास आपण त्याचा कांहीं तरी अर्थ कल्पूं शकूं, पण देवळांत सहजच जमलें पाहिजे. " लोक म्हणतात, " देवळांत मुळींच जमणार नाहीं. कारण देवळें पवित्र आहेत." मी म्हणतों देवळांत सहजच जमलें पाहिजे, कारण देवळें पवित्र आहेत. " भेदभाव शक्य तितका विसरण्यांत पवित्रता आहे, वाढविण्यांत नाहीं. व्यवहारांत देखील अभेद पाळतां आला पाहिजे. पण इतकी आपली योग्यता नसल्यास निदान देवळांत तरी अभेद पाळण्याचा अभ्यास केला पाहिजे. गणितशास्त्रांत अनंतापुढें कोणतीहि लहानमोठी संख्या शून्य बनते. देवळांत आपण परमशुद्ध प्रभूच्या समोर उभे असतो. त्याच्या शुद्धतेपुढें आमच्यांतले शुद्ध अशुद्ध सारखेंच ओंगळ समजले पाहिजेत. तेथें पुन्हां अवांतर भेद उकरून काढणें म्हणजे अधर्म आहे. पांचापेक्षां पन्नास मोठे खरे, पण अनंतापुढें दोघेहि सान्तच कीं नाहीं ? व्यवहारात मी विठ्यामहारापेक्षां स्वच्छ. पण देवळांतल्या विठोबापुढें मी आणि विठ्यामहार सारखेच कीं नाहीं ? आपण जेथें आहों तेथें देवाच्या समोरच आहों. पण आपल्याला अशी प्रतीति येत नाहीं. म्हणून मुद्दाम ह्या प्रतीतीचा अभ्यास करण्याच्या इराद्यानें आपण देवळांत जातों. तेथें जाऊन सुद्धां जर आपण "हा ब्राह्मण, हा अंत्यज " करूं लागलों तर धर्माला कांहींच आशा उरली नाहीं. तुलसीदासजी रामायण सांगत असतां मारुतीराय एका महारोग्याच्या रूपानें ऐकत होते असें सांगतात. तुलसी दासजींनीं स्वच्छतेच्या इंद्रियाला लगाम घातला नसता तर त्यांच्या हातून केवढा अनर्थ झाला असता ! जो ( घाणेरडा ) अंत्यज देवळांत आला आहे आणि ज्याला काढून टाकण्याचा मी प्रयत्न करीत आहे, तो मारुतिरायाची मूर्ति नाहीं ह्याबद्दल माझ्यापाशीं काय पुरावा आहे ? शबरीनें

रामचंद्रांना बोरें अर्पण केलीं. तीं कितपत शुद्ध होतीं ? शबरीला वाटलें, "तशींच्या तशींच बोरें देईन तर प्रभूंना आंबटचिंबट बोरें खावीं लागतील. म्हणून हरएक बोर आपल्या 'शुद्ध' दांतानें चाखून गोड असेल तेवढेंच द्यावें हें बेरं." रामचंद्रांचें स्वच्छतेचें इंद्रिय बहिर्मुख नव्हतें. त्यांना तीं बोरें स्वच्छच वाटलीं व त्यांनीं तीं प्रेमानें खाल्लीं. ह्या शबरीला जर आपण देवळांत येऊं देणार नाहीं, तर आपण तरी देवळांत कशाला जावें ? घरींच बसलेलें काय वाईट ? जो कडक सोवळा ब्राह्मण जेवतांना लहान मुलाला जवळ येऊं देत नाहीं तोच देवघरांत देवपूजा करीत असतां मुलगा अंगाला बिलगून मुतला तरी रागावत नाहीं. अशी धर्माची खूबी आहे. कारण, तो जाणत असतो कीं देवघर ही रागावण्याची जागा नाहीं. वास्तविक, रागावण्याची कुठेंच जागा नाहीं. पण आपल्याला राग जिंकतां येत नाहीं म्हणून निदान देवळांत तरी रागावूं नये असा नियम केला. पूर्वी क्रोधागार म्हणजे रागावण्याची स्वतंत्र खोली राखण्याची पद्धति होती असें रामायणांत वर्णन आहे. राग येतोसें दिसलें, कीं क्रोधागारांत दडी मारून बसावयाचें; तेथें भरपूर रागावून घ्यावयाचें आणि मन शांत झालें म्हणजे बाहेर यावयाचें. पण त्या काळीं रागावण्याचा अपवाद असेल म्हणून एका खोलीवर भागलें. आज रागावण्याचा नियम आहे म्हणून आपण न रागावण्याची स्वतंत्र खोली राखतों. सर्वत्र रागावलें तरी चालेल पण त्या खोलींत तरी रागावूं नये. ह्या न रागावण्याच्या खोलीला किंवा जागेला देवघर अथवा देऊळ हें नांव आहे. ज्याप्रमाणें अक्रोधागारांत दुसऱ्या कोणींहि येतां कामा नये, त्याचप्रमाणें अक्रोधागारांत उर्फ देवळांत सर्वांना येण्याची सूट असली पाहिजे. नाहींतर देवळाचा अर्थ काय उरला ? एरवीं विंचू पाहिला कीं पायतण उचलणारे लोक सुद्धां देवळांत विंचू न मारला जावा अशी इच्छा करतात त्याचा अर्थ काय ? व्यवहारांतले भेदभाव देवळांत न जाऊं देण्याची खबरदारी राखली पाहिजे. हाच त्याचा अर्थ नाहीं काय ? स्वयंपाकघरांतले नियम निराळे, देवघरांतले निराळे. जेवणांत स्वच्छता सांभाळावयाची असते. पूजेंत पवित्रता पहावयाची असते.

पण आज भोजनाचा धंदा करणाऱ्या लोकांच्या ताब्यांत भजनाची संस्था गेली असल्यामुळें स्वच्छता आणि पवित्रता ह्यांतील फरक कळेनासा झाला आहे. तुकारामानें "**भोजन तीं भक्ति आणि मरण ते मुक्ति**" म्हणून ज्या चार्वाकांचें वर्णन केलें आहे ते आमच्याहून निराळे नाहींत. भजन आणि भोजन ह्यांची आम्हीं जी सांगड घातली आहे ती सोडून दिल्याशिवाय देवळांत अंत्यजांचें स्वागत कां झालें पाहिजे हें आम्हांस उमजणार नाहीं. भोजन ही अमंगळ शारीरिक क्रिया आहे. त्यामुळें स्वच्छतेच्या कडेकोट पहाऱ्यांत ती करण्याचा रिवाज पाडला तरी हानि नाहीं. भजन ही पवित्र आत्मिक क्रिया आहे, त्यामुळें "**शिवतां होतसे ओवळे**" ह्या

नियम तेथें लागू नाहीं. "ब्राह्मणाचें ब्रह्म तें सोवळें आणि शुद्राचें ब्रह्म तें ओवळें" असें असत नाहीं. भजन हीं वाहती गंगा आहे. ती पवित्र आहे इतकेंच काय पण ती पावक आहे, दुसऱ्यांना पवित्र करणारी आहे. म्हणून देवळांतून अस्पृश्यता सहजच दूर झाली पाहिजे.

ह्याचा अर्थ असा नाहीं कीं देवळांत स्वच्छता राखूं नये. स्वच्छता राखण्याची इष्ट तितकी काळजी घ्यावी, पण स्वच्छतेचें स्तोम माजवूं नये. स्वच्छतेचा अत्याग्रह राखून देवळें बाटवूं नयेत. ईश्वराच्या लेकरांना त्याच्याच नांवाखालीं त्याच्यापासून दूर राखण्याचा प्रयत्न करणें म्हणजे स्वतः ईश्वरापासून दूर जाण्यासारखें आहे. आईला स्वच्छ मुलें आणि शेंबडी मुलें हा भेद ठाऊक नाहीं. तिला दोन्हीं प्यारीं आहेत. शेंबड्या मुलाविषयीं तिला अधिक काळजी आहे. आईची काळजी लक्षांत घेऊन आम्हीं वागलें पाहिजे. नाहींतर आमच्यासारखे पतित आम्हीच होऊं.



## पोंच आणि अभिप्राय

**श्रीसाईबाबा चरित्र**— लेखक, अनंत वा मराठे. प्रकाशक, द. वि. पाठक मिर्झा स्ट्रीट, मोतीबाजार, मुंबई २, पृष्ठें ८० किं. दीड रुपया.

श्रीसाईबांचीं लहान मोठीं चरित्रें आजवर अनेक निघालीं आहेत. साईबाबा हे आजच्या काळांतील एक प्रभावी संत असून, त्यांच्या एकंदर कर्तृत्वामुळें व एक जागतें आणि भक्तांच्या हांकेला ओ देणारें दैवत या नात्यानें बहुजन समाजाच्या मनावर त्यांचा दांडगा पगडा आहे. श्री. मराठे यांनीं मूळ श्रीसाई सच्चरिताच्या आधारें साधार व रसाळ भाषेंत हें छोटेखानी चरित्र लिहिलें आहे. बाबांच्या जीवनांतील महत्वाच्या घटना व त्यांचें विश्वव्यापी तत्वज्ञान यांची त्यांनीं ओळख करून दिली आहे. या पुस्तकास सभापति ना. भारदे यांचा पुरस्कार लाभला आहे. पुस्तक संग्राह्य आहे.

———

# पारमार्थिक सुखानुभव

श्रीनिसर्गदत्त महाराज हे सध्यांच्या काळांतील एक आत्मानुभवी सत्पुरुष असून ते वेळोवेळीं प्रवचनांच्याद्वारें अध्यात्मविद्येचा प्रचार करीत असतात. अशा त्यांच्या एका प्रवचनाचा सारांश आमच्या वाचकासाठीं पुढें सादर करण्यांत येत आहे.

आपणांवरच आपण करून घेतलेले आत्मप्रयोग आणि त्या प्रयोगामुळें आपणांवरच घडत असलेला परिणाम आणि त्या परिणामाचा अनुभव, भोग (प्रत्यय) काय होतो आहे, कसा होतो आहे, ह्याचें निरीक्षण करून साधक आणि बाधक निवडून, बाधक वर्ज्य करून साधक (सुखमय) सेवन करितो. मार्गदर्शक ध्रुव, साधकाला आत्मप्रत्ययाचा भोग प्रत्ययानें सूचित सूचना (बोध) देत असतो. अति आग्रही (निःसीम भक्त) मनोभावें (आत्मकळकळीनें) त्याचा अभ्यास करीत असतो. अन्याच्या मदतीशिवाय केवळ आपल्या जीवितामुळेंच मिळणारे आपले सुख (आत्मसुख) भोगण्याचा तो अति आग्रही गिऱ्हाईक बनून राहतो त्यालाच सत्याग्रही अशी उपमा देण्यांत येते. सत्याग्रही गिऱ्हाईक आत्मभोग, आत्मानुभव विरहीत दुसऱ्याचें मुळींच मानीत नाहीं. अन्य लोक प्रत्ययाच्या ज्ञानाशिवाय अनुमानानें किंवा ऐकल्या-वाचल्यामुळें उगाच चकाट्या पिटतात किंवा फुशारकी मारतात. अशा प्रकारांकडे तो सत्याग्रही गिऱ्हाईक ढुंकूनहि पाहात नाहीं. वर लिहिल्याप्रमाणें आत्मप्रयोग साधणारा तो साधक भक्ती (चिकाटीचें प्रेम) भावानें मार्गदर्शक ध्रुवानीं बोध संकेतानें दाखविलेल्या दिशेनें तडक जात असतो. इतरेजन त्याच्या आजूबाजूला आपल्या समजुतीनें जो कांहीं, कोलाहल माजवितात तिकडे तो मुळींच लक्ष न देतां आपल्या प्रयोगामुळें आपणाला काय भोग घडतो, तो भोग भोगीत निज भोगामध्यें निमग्न राहून वस्तुस्थिती (युक्तस्थिती) आक्रमण करीत राहातो.

मूलतःच आपणांला आपल्या शरीरांतून सभोंवरील जगाचा अनुभव येत आहे, म्हणून होतां होईल तो आपल्या एका शरिराच्या आधारानें आपणांला सदा सुखावस्था कशी मिळते आणि ती किती मिळते याचाच तो आत्मप्रयोग साध्य साधन करीत राहातो. दुसऱ्याच्या शरीराचा (दुसऱ्या शरिराचा) कमींत कमी उपयोग करून आपलें किती भागेल याचा विचार करितो. दुसऱ्या अनेक शरिराचा उपयोग तसेंच शरिराबाहेरील अनेक भोगाचा उपयोग वर्ज्य करितो. आपणांपासूनच आपणांला किती आराम मिळूं शकतो ह्याचा विवेक करीत तो आपली आत्मप्रगति

करीत राहातो. आत्मप्रत्ययाशिवाय इतरांच्या अनुसंधनानें जाणें आवडत नाहीं. कित्येक आत्मानुसंधांनीं ( ईश्वरभक्त ) म्हणविणारे श्रवण आणि पठणानें आपण आतां मुक्त झालों अशी समजूत करून घेवून आपल्या समजूतीला राजयोगी अशी पदवी देऊन निस्पृह लक्षण घेऊन ( बेपर्वाईनें ) उल्लू सारखें वागतांना दिसतात. स्वात्मसुखी जे सत्स्वरूप प्रातीला पावले, जे निरंजनी झाले ते उल्लू-पणानें विश्वजनाच्या ( प्राणीमात्रांच्या ) हिताहिताची पर्वा न करितां वागतात, हे खरें नव्हे. नुसत्या शब्दज्ञानानें अंतर्याम शांत झालें असे नव्हे. अंतर्याम शांत झाल्याचा प्रत्यय बाहेरील पंचविषय खाद्याची क्षुधा शांत झाली असा असला पाहिजे. आत्मभोगानें मिटलेली वृत्ति क्षुब्ध होऊन दुप्पट जोरानें विषय भोग भोगूं इच्छितें हें स्वात्मसुखी प्रत्ययवान प्रत्यगात्म्याला पटत नाहीं. उल्लूपणानें होणाऱ्या आचरणाला जर आत्मयोगी म्हणावें तर पिशाच्चाला परब्रह्म कां म्हणूं नये ?

शांति शब्दाचा अर्थ आपल्याला पुरे झाले ( आपलें पोट भरलें ) आपणाला पुरतेपणें पुरलें, आपणाला बुवा आतां पुरे, पुरे पुरे झालें म्हणूनच शांति ॐ शांति, शांत आहे, शांत आहे. शांति पावला तो शांत झाला, शांति पावला म्हणून तो शांत दिसतो. विश्व जनांशी सहज सुखद बोलतो. लोकांशीं बोलण्याबद्दल त्याला कांहीं किराया म्हणजे मोल पडत नाहीं. लोकांकडून कांहीं मिळावें तरच मी कांहीं बोलावें असें त्याच्या जवळ नाहीं. शांत झालेले सन्मार्गी म्हणून म्हणविणारे लोकांकडून बोलण्या चालण्याबद्दल भारी मजूरी मागतांना दिसतात. अनेक प्रकारचा भुर्दंड लोकांना भरावयास लावितात असें कां व्हावें ? बोलण्याचालण्याबद्दल लोकांकडून कांहीं आपल्याला मिळावें, लाभावें असें जर त्यांना वाटतें आहे तर तेहि अजून भिक्षूक राहिले आहेत. लोकांकडून कांहीं मागतो ही भिक्षाच नव्हे काय ? जनाला अदृष्ट ( जनाच्या दृष्टी पलीकडे ) असलेले सुख जर त्याला मिळालें तर जनांचा ऐहिक सुखांतील भिक्षेची वांच्छा त्याला कां असावी ? आपल्या अविनाशी जीवितापासून मिळणारा सुखाचा झरा जर त्याला लाभला आहे तर जनाशीं बोलण्या-चालण्यांतील क्रियेबद्दल आपणांला कांहीं लाभावें अशी भिक्षुकवृत्ति त्याच्याजवळ कां असावी ? ॐ शांति. मंत्र उल्लेखानें अंतर्यामींच्या सुखानें सुखावल्याचा ढेकर दिला असें झाल्यावर उल्लूपणाच्या आचरणानें लोकांना डोईजड होईल असे प्रकार कां दिसावे ? आत्मानुकूल करून घेतलेला पुरुष विश्व-जनांकडून आपणांला कांहीं मिळावें अशी अपेक्षा करीत असेल असें शक्य वाटत नाहीं. आत्मतुष्टी पुरुष इतरेजनांना सहज सहज आत्मपुष्टी देतो. त्याच्या बोलण्या-चालण्यानें, त्याच्या सांसर्गानें, परिचयानें त्याच्या सहज क्रिया वर्तनानें ( आचरणानें ) लोकांना हितावह वाटून लोकहित वाढतें.

लोकहित जसजसें वाढूं लागतें, तसतसें लोक त्याला आपल्या निर्वाहाचें महा

अन्न समजून अंतर्यामींच्या कळवळ्यानें चाहतात; भजतात ( जपतात ) आपलें पोषक अन्न आपल्याला हमेशा मिळावें, आपणांला ह्याची फार फार गरज आहे आपल्या निर्वाहाचें हे मुख्य साधन आहे असें समजून प्राणिमात्र आपल्या जीवाचें मोल देऊन जसें अन्न मिळवितात, संचय करितात, त्याला जपतात त्याप्रमाणें ॐ शांति पावलेल्या पुरुषाला विश्वजन भजतात. ॐ शांतिचा अर्थ स्वस्थिती स्वजात, स्वधर्म मलिन होऊन स्वरूपस्थिती, आत्मस्थिती पुरेपूर लाभली असा पूर्ण अर्थ आहे.

असें असतांना कित्येक लोक सत्पुरुषाकडून मंत्र तंत्र विधी नियमादिक कांहीं आचरण क्रिया समजावून घेवून साधनीं लागतात, त्याच्यातून ( साधन क्रियेंतून ) पुष्कळ नवीन नवलाई, निर्माण होतांच तेवढ्यांतच आपलें सफल झालें आपण योग्यता पावलों इत्यादि आपल्या अपुऱ्या समजुतीनें समजूत घेऊन बिनदिक्कत, स्वैराचरण करून राजयोगी भावना धरून यथेच्छ ( साधल्यास ) वस्तुतः मुळींच गरज नसलेले निंद्य शब्दानें ज्यांचा उल्लेख होतो असें अगदीं टाकाऊ भोग भोगतात. जसें कोणी एक रोडावलेला प्राणी, हतबल झालेला ( गाढव ) कोणा दयाळूंच्या दृष्टीस पडला, दयाभूतपणें त्यानें त्याला स्वच्छ पाणी, ओलें सुकें गवत इत्यादि देऊन ताजातवाना केला, ताजातवाना झाल्यावर तो तिथून मारे उड्या मारीत निघाला, त्याला त्याच्या जातीची एक मादी दिसली. तिच्या मागें तो धांवतच गेला. ती पळत पळत गांव उकिरड्याच्या ढिगाजवळ गेली, व तो मोठ्या मौजेनें तिच्याशीं लाडीगोडीनें स्नेह संपादन करून राहिला, तिच्या आणखी पण कांहीं जात बहिणी तिथें जमल्या, मग त्या सर्वांनीं मिळून यथेच्छ उकिरडा खाल्ला आणि मजा करावी असा क्रम आरंभिला, कांहीं काळानें कांहीं त्यांचे जातभाई पण त्यांच्यात सामील झाले. त्यांच्या समजूतीनें जणुं तें रामराज्यच आहे, असें मानून त्या मूर्ख जीवानें अशा प्रकारांत आपल्या आयुष्य काळाची इतिश्री केली.

अशा प्रकारें आपण ज्ञानमंडित समजून उल्लुपणा पत्करला. राजयोग सिद्धीचे मालक आपण आहोंत असें समजून वागणारे जगांत ठिकठिकाणीं थवेच्या थवे दिसतात. स्वात्मसुखाचा आत्मप्रयोग आत्मप्रयोगें साधन करून आपल्या अविनाशी परमात्मस्वरूपापासून स्वात्मसुखाचा निर्मल घांस ( भोग ) ज्यानें मिळविला तो त्या घांसानें ( भोगानें ) तृप्त झाला. मग जगांतील उच्छिष्ट ( निंद्य ) नाममात्र सुख, परंतु जातीनें उगाच दुःखमात्र ( क्षीणमात्र ) दमदमून घायाळ, हैराण, पुन्हां पुन्हां नाराज ज्याच्यामुळें होतो, असे तें त्याज्य ( कुचेष्टा ) मात्र असलेले ऐहिक सुख स्वात्मसुखी पुरुषाला कसें आवडणार ?

श्रीदासगणूमहाराज यांची

# व्रतवैकल्यांवरील निस्सीम श्रद्धा

तीर्थजननी गोदावरीच्या कांठीं मराठवाड्यामध्यें 'रत्नेश्वराची रामपुरी' या नांवाचें एक रमणीय क्षेत्र आहे. त्या ठिकाणीं गायत्रीचें चोवीस लक्षांचें पुरश्चरण करण्याचें श्रीदासगणू महाराजांनीं ठरविलें. आपल्या बरोबरीच्या वीस पंचवीस मंडळीं-सह महाराज अनुष्ठानाच्या उद्देशानें तेथें गेले असतांना ग्रामस्थ म्हणाले,

" येथें पुरश्चरण करण्याचा विचार सोडून द्या. आजपर्यंत कोणाचेंहि पुरश्चरण येथें तडीस गेलें नाहीं. अनेक तऱ्हेचीं संकटें येतात. कित्येक वेळां कर्त्यांच्या जीवासहि धोका होतो. असा अनेक वर्षांचा अनुभव आहे.

श्रीदासगणू महाराज म्हणाले, " माता गायत्रीचें पुरश्चरण करतां करतांच जर मरण येणार असेल, तर यापेक्षां अधिक भाग्याची गोष्ट कोणती ? पुरश्चरणाच्या हेतूनें मी येथें श्रीरत्नेश्वराच्या चरणीं आलों आहें. पुरश्चरण न करतां परत जाणार नाहीं.'

समागमें असलेल्या मंडळींचा धीर थोडा खचल्यासारखा झाला होता. परंतु श्रीदासगणू महाराजांवर विश्वास असल्यानें कोणी बाहेर कांहीं दाखविलें नाहीं. पुरश्चरण योग्य प्रकारें सुरू झालें. रात्रीच्या वेळीं मंदिराच्या जवळच असलेल्या जंगलांतून रडण्यासारखा एक विचित्र आवाज येत असे. बरोबरची मंडळी फारच घाबरली. येणाऱ्या संकटाची ही पूर्वसूचना वाटली सर्वांना. महाराज शांत होते. ते म्हणाले, 'जें स्वतःच रडतें, त्याला रे कसले भितां !' पुरश्चरणाकरितां आलेल्या लोकांत श्री. भगवानराव मांजरमकर या नांवाचे भूतविद्या, जादूटोणा यांच्या अभ्यासांत कांहीं वर्षें घालविलेले व कंटाळून नंतर भक्तिमार्गी बनलेले महाराजांचे एक निस्सीम भक्त होते. ते बरोबर दोन धीट माणसें घेऊन त्या आवाजाच्या शोधासाठीं रात्रीं दहा

---

मी आतां लोकांकडून गुरू म्हणवून घेणारच. लोकांना माझ्या पायां पडावयास लावीनच लावीन, माझ्याच पाया पडले पाहिजे. माझ्या एका शब्दांत सर्वांनीं वागले पाहिजे. इत्यादि तुटपुंज्या अपुऱ्या भावना स्वत्मसुखपूर्ण पुरुषाच्या ठिकाणीं असणें संभवत नाहीं. आपल्या मूळ जीवितापासून ज्याला सांप्रत काळीं सुखनैवेद्य सहजपणें मिळतो आहे. ( भोगतो आहे. ) त्याला शरीराबाहेरील सुखोपभोगाची चणचण रहात नाहीं, ( भासत नाहीं. ) आत्मजीवित पूर्णतः संतोष पावलें आहे, असा जो अनुभव खातो आहे, तोच पारमार्थिक सुखभाव आहे.

वाजतां निघाले. ज्या बाजूस जावें, त्याच्याविरुद्ध बाजूस रडण्याचा आवाज येत असे. दोन तीन तास हिंडून सर्व जंगल धुंडाळूनहि हा आवाज कोणाचा, कोठून येतो, याचा पत्ता लागला नाहीं. चार पांच दिवस हा आवाज येत होता. मग पुढें मात्र येईनासा झाला. सर्व पुरश्चरण निर्विघ्नपणें पार पडलें.

पुरश्चरणाचा दैनिक कार्यक्रम एखाद्या ऋष्याश्रमांत शोभण्यासारखा, नियमबद्ध पवित्र व धार्मिक असे. सकाळीं साडेचार वाजतां सर्व मंडळी झोंपेंतून उठत. प्रातर्विधी उरकून पांच ते सहा प्रातःस्मरण करीत. अनेक प्रकारच्या भूपाळ्या म्हणत, नंतर सहा वाजतां नदीवर सर्वांचीं स्नानें होत. अर्ध्या तासांत आपलें संध्यावंदनादि आन्हिक उरकून साडेसहा वाजतां सर्वजण गायत्रीच्या जपास बसत. बसण्यासाठीं प्रत्येकाला खालीं कुशासन व वर मृगचर्म घातलेलें असे. जपाचा कार्यक्रम दुपारीं बारा वाजेपर्यंत चाले मग भिक्षा होई. महाराजांच्याविषयीं आदर असलेला कोणीतरी एक स्नेही ही भिक्षा करी. ज्या दिवशीं अन्य कोणी नसे, त्या दिवशीं श्री. बाबासाहेब नांदेडकर भिक्षा करण्यास सिद्ध असत. भोजनोत्तर थोडी विश्रांति घेऊन दोन वाजतां श्रीज्ञानेश्वरी, दासबोध, गाथा, श्रीमद्भागवत इत्यादि ग्रंथांचें वाचन होई. मधून मधून श्रीदासगणू महाराज त्यांतील एकाद्या ओवीवर विवेचन करीत. हा कार्यक्रम पांच वाजेपर्यंत चाले. नंतर सर्वमंडळी संध्यावंदनाकरितां गोदेवर जात. परत आल्यावर भजन व धूपारती होई. थोड्याशा अल्पोपहारानंतर रात्रीं नऊ वाजतां सर्व व्रती निद्रावश होत.

श्रीदासगणूमहाराज साठीनंतरच्या उतरत्या वयांतहि सर्व कार्यक्रम निष्ठेनें व निग्रहानें पार पाडीत. इतरांनाहि मग आपल्या वागणुकींत अळंटळं करतां येत नसे. या कार्यक्रमाव्यतिरिक्त महाराजांचे नित्यनियमाचे विष्णुसहस्रनामाचे बारा पाठ असतच. हें विष्णुसहस्रनाम जणुं त्यांचें जीवन बनलेलें आहे. कान्हा भिल्लाच्या प्रकरणापासून सुरू झालेलें हें व्रत आज नित्यनेमानें अखंडपणें चालू असे. जीवावरचीं तीन चार दुखणीं येऊन गेलीं; पण त्या मुदतींतहि विष्णुसहस्रनामाच्या पाठांत कधीं खंड पडला नाहीं. मध्यंतरीं त्या व्रताचें उद्यापनहि झालें, परंतु पाठ करणें कांहीं थांबलें नाहीं. बाराच पाठ करावे, असा नियम राहूं नये व पाठ न झाला तरी चालावें यासाठीं वास्तविक उद्यापन केलें; परंतु नंतर पाठांची संख्या अधिकच झाली होती.

पुरश्चरण यथासांग पार पडलें. सांगतेच्या वेळीं देवतेच्या प्रस्थापनेसाठीं श्रीयंत्र मिळालें, तर उत्तम असें ब्राह्मणांनीं सांगितलें. समाप्तीच्या आधीं तीन चार दिवस एक अतिशय वृद्ध ब्राह्मण गृहस्थ श्रीदासगणू महाराजांकडे आले आणि म्हणाले,

'श्रीवासुदेवानंद सरस्वतीमहाराजांनीं हें यंत्र आपणांस द्यावें, असा दृष्टान्त स्वप्नांत दिला. त्याप्रमाणें मी तें आपणांस देण्यासाठीं आलों आहे. स्वामीमहाराजांनींच हें श्रीयंत्र उपासनेसाठीं फार पूर्वीं मला दिलें होतें. आतां आपण त्याचा स्वीकार करा.'

'श्रीस्वामीमहारांनीं तुम्हांला दे म्हणून दृष्टान्त दिला; पण घे म्हणून मला कोठें दृष्टान्त दिला? केवळ तुमच्यावर भरंवसून उगीच्या उगीच या वस्तूचा स्वीकार मी कसा करूं?'

तो गृहस्थ केविलवाणेपणानें म्हणाला, 'महाराज, काय सांगूं आपणांला! आजपर्यंत जीवाभावानें सांभाळलेली ही वस्तु आहे. हिच्या सेवेव्यतिरिक्त मीं आयुष्यांत कांहीं केलें नाहीं. माझ्या लेखी हिचं मोल करतां येणार नाहीं, इतकें आहे. उगीच्या उगीच हें यंत्र दुसऱ्याच्या स्वाधीन करण्याला मी कसा धजेन? श्रीस्वामीमहाराजांची आज्ञा म्हणूनच मी हें आपणांस देण्यास आलों आहे. आपण स्वीकार करींपर्यंत मीं अन्न घेणार नाहीं.'

तो वृद्ध गृहस्थ अन्नाचा एक कणहि न घेतां दोन दिवस महाराजांपुढें निग्रहानें बसून राहिला. इतरांनीं मग महाराजांना म्हटलें,

"आपणहून अनुष्ठानाच्या समाप्तीकरतां लागणारें श्रीयंत्र घरीं चालत आलें आहे. उगाच कां नाकारावें? मुद्रेवरून हा गृहस्थ खोटें सांगेल, असें वाटत नाहीं. गृहस्थ भाविक दिसतो. बरं, ती वस्तु आपणांस देण्यांत त्यास कांहीं अपेक्षा आहे, असेंहि नाहीं."

"हा गृहस्थ श्रीटेंबेस्वामींजवळ होता," असें श्री. त्र्यंबकराव वाकुडकरांनींहि सांगितलें.

श्रीदासगणूमहाराजांना काय वाटलें कोणास ठाऊक. त्यांनीं तें पवित्र श्रीयंत्र स्वीकारलें. महाराजांच्या पूजेंत तें नेहमीं असे. महाराजांनीं यंत्र स्वीकारतांच वृद्धास फार आनंद झाला. मोठ्या प्रेमानें नमस्कार करून तो परत निघून गेला पुरश्चरणाच्या समाप्तीचें होमहवन यथाविधी पार पडलें. सर्व गांवास पक्वान्नाचा भंडारा झाला. सात आठ हजार माणसांनीं गायत्रीचा प्रसाद म्हणून जेवण केलें. यावेळींच 'गायत्रीस्तव' या नांवाचें २८३ ओव्यांचें एक स्तोत्र श्रीदासगणूमहाराजांनी लिहिलें आहे.

श्रीदासगणू महाराजांनीं शके १८४९-५०-५१ अशीं क्रमानें तीन वर्षें गायत्रीचीं तीन पुरश्चरणें केलीं. त्यांतील पहिलें हें रत्नेश्वर रामपुरीस केलेलें २४ लक्षांचें, दुसरें वऱ्हाडांतील लोणार-मेहकर येथें केलेलें १९ लक्षांचें व तिसरें सुप्रसिद्ध ज्योर्तिलिंग भीमाशंकर येथें केलेलें ३ लक्षांचें. हीं तिन्हीं पुरश्चरणें सामुदायिक स्वरूपाचीं होतीं. पवित्र

आचरणाची काय गोडी आहे व त्यामुळें कशी मनःशांति मिळते, हें साधकाच्या नीट लक्षांत यावें, यासाठींच या पुरश्चरणांचें अनुष्ठान होतें.

शके १८४३ च्या सिंहस्थामध्यें श्रीदासगणु महाराजांनीं गोदेची प्रदक्षिणा पायीं केली. पस्तीस मंडळी मिळून महाराजांच्या समागमें यात्रेस निघाली होती. रोज सकाळीं उठून पांचसहा कोस चालावे व सोईस्कर गांव पाहून मुक्काम करावा. गांवामधील सर्व व्यवस्था श्री. दामूअण्णा ठेवीत. श्री. भगवानराव माजरमकर यांचा उल्लेख मागें एकदोन वेळां आला आहे. हे हरहुन्नरी आणि निष्ठावंत गृहस्थ सर्व मंडळींची पादत्राणें नीट करण्याचें काम करीत. यांची सेवावृत्ति खरोखरीच अलौकिक होती. जातीनें हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण; पण अमुक एक काम मी करीत नाहीं, असें तें कधींहि म्हणाले नाहीत. भीमाशंकर येथील गायत्रीपुरश्चरणाचे वेळीं श्रीदासगणु महाराजांना प्रायश्चित्त-विधीसाठीं क्षौर करणें अवश्य होतें. सह्याद्रीच्या त्या शिखरावर न्हावी कुठला ? शेवटीं महाराजांच्या सहवासांत कांहीं दिवस घालविण्यासाठीं इंदूरहून मुद्दाम आलेले श्री. भगवानराव बनसोडे यांची स्मश्रूची साधनें घेऊन श्री. भगवानराव माजरमकरांनींच तें काम पार पाडलें. गंगाप्रदक्षिणेच्या वेळीं बरोबरीचें सामान नीट बांधणें व गांवांतून आणलेलें सामान ज्याचें त्यास परत करणें हीं कटकटीची कामेंहि श्री. भगवानराव माजरमकर करीत. नासधूस न होऊं देतां कोठी कशी संभाळावी हें त्यांचेपासून शिकावें.

प्रदक्षिणेच्या वेळीं दुपारीं निरनिराळ्या पोथ्यांचें पारायण व रात्रीं भजन होऊन सर्व यात्रेकरू निद्रा घेत. दुसरे दिवशीं सूर्योदयापूर्वी प्रवासास आरंभ होई. सामानासुमानासाठीं बरोबर बैलगाड्या होत्या. या यात्रेचे वेळीं एक चमत्कार वाटण्यासारखी आश्चर्यकारक गोष्ट घडली आहे. प्रदक्षिणेस सुरवात करतांच दुसऱ्या तिसऱ्या दिवशींच श्रीमहाराजांच्या या मंडळीबरोबर एक कुत्रा आला. उंच आणि पुष्ट बांध्याचें हें जनावर दिसण्यांत उग्र दिसत असलें तरी त्याच्या स्वभावामध्यें फार अलौकिकता होती. चालतांना तो कुत्रा महाराजांच्या मागे पुढें असे. भजनाचे वेळीं कान टवकारून समोर बसे. रात्रीं बैलगाड्यांच्या भोंवतीं राहून सामानाची राखण करी. बरोबर कडक सोवळें असलेली कांहीं स्त्री-पुरुष मंडळी होती; पण त्यांच्या वस्त्रपात्रांस हा कधीं शिवला नाहीं. एकादशीसारख्या उपासाच्या दिवशीं तो भाकरीस तोंड लावीत नसे. महाराजांनीं त्याचें नांव कौतुकानें गंग्या ठेविलें होतें. पहिल्या दोन तीन दिवसांत त्याला हकलून देण्याचा मंडळींनीं प्रयत्न केला; पण त्याचे सद्गुण प्रत्ययास आल्यावर गंग्या सर्वांनाच हवासा वाटूं लागला. रोज आपणहून गंगास्नान केल्याशिवाय गंग्या कधीं राहिला नाहीं. सर्व तीर्थांत त्यानें स्नान केलें. त्र्यंबकेश्वरी कुशावर्त तीर्थांत माणसासहि स्नान करूं देत नाहींत. गंग्याचा स्वभाव माहीत असल्यामुळें महाराजांनीं त्यास आवरून धरण्यास सांगितलें होतें; पण सर्वांची नजर चुकवून गंग्या कुशावर्तांत बुडी मारून आलाच. परकें कुत्रें दिसलें कीं, कुत्री कशीं गुरगुरत

उठतात व त्यांची कशी कळवंड जुंपते, हें सर्वांस माहीत आहे; पण रोज नवीन गांवांत येत असूनहि कोणतेंहि कुत्रें गंग्यावर भुंकलें नाहीं. अंगावर धांवून येण्याची गोष्ट तर दूर राहिली. उलट गांवांतील कांहीं कुत्रीं गंग्याबरोबर पुढच्या गांवापर्यंत येऊन परत जात. महाराजांचें या गंग्यावर फार प्रेम होतें. त्याच्या खाण्यापिण्याची चौकशी ते स्वतः करीत. गंगाप्रदक्षिणा झाल्यानंतर त्यांनीं या कुत्र्याला संभाळण्यासाठीं हिंगोलीचे वकील श्री. दादासाहेब वरूडकर यांचे स्वाधीन केलें होतें; पण गंग्या तेथें राहिला नाहीं. कुणीकडे निघून गेला व नाहींसा झाला.

गंगाप्रदक्षिणेस श्रीदासगणू महाराजांना सुमारें तीन साडे तीन महिने लागले. ही प्रदक्षणा त्यांनीं नाभीस्थानापर्यंतची केली होती. नांदेड हें गोदावरीचें नाभीस्थान समजण्यांत येतें. तेथून श्रीगोदावरीस उजवे घेऊन प्रदिक्षणेस आरंभ झाला. त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरीस प्रदक्षिणा घालून महाराज परत फिरले आणि नांदेड येथेंच प्रदाक्षिणेची समाप्ति केली.

या प्रदाक्षिणेच्या वेळीं महाराजांना शारीरिक कष्ट फारच पडेल. गोदावरी दृष्टिपंथांत ठेवून चालावयाचें असा नियम असल्यामुळें चांगला रस्ता असा कधीं मिळत नसे. फार तर पाऊलवाट मिळावयाची. काटेकुटे, दगडधोंडे आणि उंचसखल-पणा यांच्या त्रासाला प्रमाणच नसे. योग्य अंतरावर राहण्यास योग्य गांव मिळेल, याची शाश्वति नसे. कित्येकदां आकाशाच्या छत्राखालींच राहण्याचा प्रसंग येई; ऊन वारा धूळ, थंडी, क्वचीत पाऊस यांचाहि त्रास फार होई, पण या सर्व अडचणी सोसून महाराजांनीं आपलें व्रत पुरें केलें.

शके १८६६ च्या मार्गशीर्ष महिन्यांत त्या वेळच्या मिरज संस्थानांतील मोडलिंबजवळच्या अरण गांवीं श्रीसांवतामहाराजांच्या समाधीसमीप श्रीदासगणू महाराजांनीं संहिता स्वाहाकार केला. युद्धजन्य परीस्थितिमुळें अन्नधान्याची परिस्थिति मोठी बिकट होती; पण महाराजांचें हें कार्य कोणतीहि उणीव न पडतां मोठ्या थाटानें पार पडलें. श्रीमंत राजे तात्यासाहेब पटवर्धन यांचे या कामीं बरेंच साहाय्य झालें. शके १८७२ च्या फाल्गुन वद्य एकादशीस गोरटें येथें रुक्मिणी—पांडुरंगाच्या मूर्तींची स्थापना केली. शके १८७४ च्या कार्तिक वद्यांत पंढरपूर येथें भागवत स्वाहाकार केला. शके १८७५ च्या फाल्गुन महिन्यांत गोरट्यास श्रीपांडुरंगाचें समोरच्या बाजूस शनिदेवाची स्थापना केली. त्यावेळीं मीं मुद्दाम प्रश्न केला.

'दादा, पांडुरंगाची स्थापना केल्यावर पुन्हां शनीची प्राणप्रतिष्ठा करण्याची आवश्यकता कां वाटली?'

"हें बघ, मामलेदारापुढें पट्टेवाला अवश्य पाहिजे. लोकांच्या धार्मिकतेच्या मुळाशीं असलेल्या मनोवृत्तीची तुला कल्पना नाहीं. माणूस जी एकादी गोष्ट करतो, तीं कोणत्यातरी धाकानें वा लालुचीनें. शनीचा धाक वाटतो लोकांना. माझ्या

पांडुरंगाचा नाहीं. शनीसाठीं लोक येथें येतील आणि मग पांडुरंगास नमस्कार केल्यावांचून जाणार नाहींत. पांडुरंगाच्या स्थापनेच्या वेळेपेक्षां यावेळीं किती अधिक गर्दी झाली, हें पाहिलेंस ना तूं ? पांडुरंगाला लोकांनीं नुसतां नमस्कार केला, पण स्थापना झाल्यावर शनीपुढें पांचशें नारळ फुटले. आहे कीं नाहीं मौज ! ”


असें स्पष्टीकरण होतांच मला अर्थातूच फार बरें वाटलें. मी आतांपर्यंत अनेक वेळीं असें अनुभविलें आहे कीं, श्रीदासगणू महाराजांच्या या निरनिराळ्या व्रतानुष्ठानामागें त्यांचा जीवनहेतुच कोणत्या ना कोणत्या रूपानें अधिष्ठित असतो. लौकीकासाठीं त्यांनीं आजपर्यंत एकहि कृत्य केलें नाहीं. त्यांच्या सर्व जीवनांत कोणताहि क्षण स्वार्थसाधनाकरितां घालविला आहे वा कोणत्याहि गोष्टीची कधीं विशेष अपेक्षा केली आहे, असें मला आठवत नाहीं.

—श्री. अनंतराव आठवले लिखित संतकवि श्री. दासगणू महाराज या ग्रंथावरून संक्षेपित


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स,** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. साखरकर




## भक्तांचे विविध अनुभव

### दृढ श्रद्धेचें फळ मिळतेंच

श्री. शिवराम बाळाजीराव राणे, दु. वांद्रें ( वांद्रा पोष्ट ऑफिस ) मुंबई नं. ५० हे लिहितात कीं,

मी माझा एक अनुभव ( चमत्कार ) जो मला बाबांच्या समाधिमंदिरांत आला तो श्रीसाईलीला मासिकांत छापण्यासाठीं खालीलप्रमाणें देत आहे.

" मी सुमारें ८–१० वर्षांपासून नेहमीं बाबांचें नामस्मरण करीत आहे. बाबांचे अनेक परमभक्त, माझे ओळखीचे असून त्यांच्याकडून पुष्कळशा श्रीसाईलीला मी ऐकल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी मी शिरडीस जाऊन आलों. त्यानंतर मला या वर्षी शिरडीस जाण्याची प्रबळ इच्छा झाल्यानें गुरुवार ता. २७–१–६३ ला शिरडीस आलों. बाबांचे समाधीचें दर्शन घेतलें; मनाला शांती लाभली. शुक्रवारीं नित्यनियमाप्रमाणें सकाळीं बाबांच्या समाधीस आंघोळ घालण्याचे वेळेस बाबांना हार घालावा अशी मला इच्छा झाली. लगेच दुकानांत जाऊन हार घेतला. हार घेऊन मंदिरांत येतों तो सर्व भक्त बाबांना आंघोळ, हार घालत असलेले दिसले, म्हणून मी तो हार तेथल्या वाचमनकडे दिला व बाबांच्या समाधीस आंघोळ घालण्यांत सहभागी झालों. आंघोळ झाल्यानंतर माझा हात पटकन् खिशाकडे गेला, पण काय ! खिशांत पाकीट नव्हतें. पाकीट कुठेंतरी पडलें किंवा कुणीतरी मारलें हें निश्चीत. तेथल्या तेथें चौकशी केली. पण पाकीट मिळालें नाहीं. पाकीटांत रुपये २०/– अधिक चांदीचे दोन रुपये होते. शिवाय कांहीं कागदपत्र व रेल्वेपास होता. भाई व माझे मेहुणे जे माझेबरोबर शिरडीस आले होते त्यांची अशी खात्री झाली कीं पैसे असलेले पाकीट मिळणें कठीण. परंतु बाबांवर भरंवसा ठेऊन प्रार्थना केली कीं, तुमच्या मंदिरांत माझें पाकीट गेलें आहे. अशा स्थितींत मी मुंबईस गेल्यावर माझें पाकीट हरंवलं हें सांगणें मला प्रास होईल. तेव्हां आपणांस योग्य वाटेल तें करा. येवढें करून निश्चित मनानें बाबांवर भरंवसा ठेऊन स्वस्थ राहिलों. फक्त श्री. बागवे (तेथले एक अधिकारी) यांना

सूचना देऊन ठेवली. अर्ध्या तासाच्या आंत 'तुमचें पाकीट मिळालें आहे. ओळख पटऊन घेऊन जा, असा निरोप आला. श्री. बागवे यांच्याजवळ जाऊन पाकीटाची ओळख पटवून दिली. पाकीट घेतले. आंतील सर्व वस्तु जशाच्या तशा होत्या. मी व माझे मेहुणे मंदिरांत आलो व प्रार्थना केली कीं बाबा! तुमच्या कृपेमुळें माझी वस्तु मला मिळाली. भक्तांची लाज आपण राखलीत.

या माझ्या वरील अनुभवानें असें सिद्ध झाले आहे कीं, बाबांच्या चरणीं दृढ भाव ठेविल्यास आपणांस कोणत्याहि तऱ्हेची काळजी करण्याचें कारण नाहीं. मी प्रवासास (शिरडीस) आलेला मनुष्य अशा परिस्थितींत पाकीट जाणें फारच अडचणीचें झालें असतें. पण बाबांनीं आमची चिंता, मी माझा भाव त्यांच्या चरणी एकनिष्ठ केल्यानें वाहिली.

त्याचप्रमाणें ८–१० वर्षांत अनेक संकटें, प्रसंग माझ्यावर आले पण बाबांचे नामस्मरण केल्यानें माझी सर्व संकटें टळलीं. असा माझा आतांपर्यंत अनुभव आहे.

× × ×

### श्रीसाईबाबांचें मार्गदर्शन

श्री. गजानन केसरीनाथ म्हात्रे, मुंबई (सविस्तर पत्ता कळविला नाहीं) हे लिहितात कीं,—

सन १९५२ सप्टेंबरपर्यंत आम्हांला साईबाबांची कांहींच माहिती नव्हती. माझी पत्नी सौ. वासंती ही नेहमीं आजारी असे. आजारपणांत डोळ्यांतून, तोंडामधून रक्त येत असे, डॉक्टरच्या सांगण्यावरून पत्नीला आईकडे पाठविण्यांत आले. आमच्या घरांत साईबाबांचा फोटो नव्हता. एके दिवशीं तिला साईबाबांनीं दर्शन दिलें. ती आजारपणांत २१ दिवस दुधावर होती. त्या २१ दिवसांत ती रात्रीं १२ पासून ४ पर्यंत ध्यानमग्न असे व हिंदी भाषेंमधून बोलत असे. शिरडी व साईबाबा आम्हांला १९५२ पासून समजले, १९५२ पासून वेळोवेळीं स्वप्नाच्या द्वारें तसेंच ध्यानप्रसंगीं होणाऱ्या प्रेरणांनीं त्यानीं मार्गदर्शन केलें आहे.

ज्या आजारांत डॉक्टर अपयशी झाले तेथें श्रीसाईबाबांची उदी प्रभावी ठरली. व १९५२ पासून माझ्या पत्नीची स्थिति आरोग्य दृष्टीनें चांगली असून प्रत्येक वेळीं साई मार्गदर्शन करीत असतात.

आपल्या धर्मशील व सत्यवृत्तीनें आपण चालतों. तेथें ईश्वरी मार्गदर्शन होतें. भक्तांचा विश्वास पाहिजे ही खात्री मनोमन पटली.

आमच्या लहानशा जागेंत "उदी अक्षरे" आपोआप लिहिली जातात त्याची लांबी, रुंदी व उंची ठराविक मापाची असतात. ही अक्षरें २५ नोव्हेंबर १९५७ पासून लिहिली जातात. ही अक्षरें हिंदी भाषेंत असतात. ते भक्तांना मार्गदर्श करतात.

ईश्वर जिवंत असून तो भक्तावर कृपा करीत असतो. त्याची प्रचिती श्रीसाईबाबांनीं भक्तांना दिलेली आहे. उर्दी अक्षरे ता. ३०-३-१९६३ मध्यें टेबलावर दिसली ती पुढीलप्रमाणें होती-वेळ ५ वा. संध्याकाळीं.

"और पैसा चिज कुच्च नहीं
और दुनयामे सचा बात करना

गरिबको मदत करना और कोई आदमी के सात झगडा नहीं करना और श्रद्धा सबुरि धरना तो अच्छा होगा और अल्ला तेरा भला करेगा."

× × ×

**बाबांची कृपा**

श्री. रघुनाथ बाबुराव सांडभोर ७९७ कसबा पुणें २ हे आपला श्रीसाईनाथांचा अनुभव कळवितात तो असा:—

गेल्या श्रावण महिन्याची गोष्ट. माझे एक स्नेही श्री. सुभाष हे मला भेटले व सहज बोलतां बोलतां मॅट्रिक का होत नाहींस. पुष्कळ क्लासेस आहेत, कर कीं प्रयत्न असें म्हणाले. मला तें पटलें व त्यांचे मॉडर्न व्ही. नाईट स्कूलमध्यें त्यांनीं मला दाखल केलें. माझा पगार थोडा व मुलें ३ यामुळें ओढाताण असे. तशांत माझा नं. ३ चा मुलगा वय वर्षें ४ हा एक वर्षांपासून कमरेखाली पांगळा झाल्यानें व त्याचे डॉक्टरी उपचारावर सुमारें ७००/८०० रुपये खर्च झाले असल्यानें मी विवंचनेत होतों. पण बाबांचा निस्सिम भक्त असल्यानें जमेल तशी पुजा अर्चा व प्रार्थना करीत होतों. पण ग्रहदशा संपत नव्हती. एके दिवशी श्री. सुभाष जवळ मुलाची हकीकत बोलतां ते म्हणाले, मला पूर्वींच कां सांगितलें नाहींस. माझे बंधू वसंत हे डॉक्टर आहेत. त्यांना दाखवूं तुला खर्च जास्त येणार नाहीं. याची खात्री ठेव. त्याप्रमाणें मी बायको व मुलाला घेऊन त्यांचें घरीं गेलों. पहातो तों त्यांचें दवाखान्यांत श्रीसाईचा फोटो! तेही बाबांचे भक्त होते. डॉ. वसंतरावांनीं त्याला तपासून मला सांगितलें कीं, मी त्याला चार पांच महिन्यांत चालावयास लावतो. काळजी करूं नको व खर्चहि फार येणार नाहीं. मी बाबांचे स्मरण व प्रार्थना करून औषधोपचार सुरू केले. त्या गोष्टीला आतां ६ महिने झाले, चार महिन्यांनी तो पुष्कळच सुधारला. आतां तो चांगला चालूं लागला आहे. व या सर्व गोष्टीस मला केवळ रु. १५० खर्च म्हणजे कांहींच आला नाहीं. डॉ. वसंतरावांचे मजवर फार उपकार झाले. पण बाबांवरील दृढ निष्ठेचें फळ मला मिळालें तसेंच श्री सुभाष यांनीं पण मला फार मदत करून क्लासचें फीतही सवलत दिली ही सर्व श्रीसाईनाथांची कृपा होय.

---

# संत दामोदरस्वामी

लेखक : श्री. ना. त्र्यं. जवारकर, धुळें

पश्चिम खानदेश पैकीं तळोदे तालुक्यांत प्रकाश क्षेत्री यांचा जन्म झाला. लहानपणापासून गळ्यांत तुळशी मण्याची माळ घालून एकांतांत भागवत वाचीत बसत. पुष्कळ पारायणें झाली. प्राचीन पुस्तकांचे आधारें भैरवाचे उपासनेस आरंभ केला. भैरव गुप्तपणें वर माग म्हणाला, प्रगट होऊन दर्शन दे. दामोदरस्वामी म्हणाले, रामदर्शन घडवून द्यावें म्हणून बोलावलें. मंत्र तंत्र कांहींचीच जरूरी नाहीं. रामदर्शन करून देणें माझें हातीं नाहीं असें बोलून भैरव निघून गेल्याचे स्वामींनीं जाणले. तापी तिरी मुडावर गांवी सत्तु व निंबाचा पाला यावर राहून एकांतात रघुपतीस आळविणेचें व्रत सुरूं केलें. रामायण वाचावें. रात्री गांवांत येऊन निद्रा करावी. वनांत ज्या झाडाखालीं बसून रामायण वाचीत त्या झाडावर चार वानर येऊन बसत. रामायण संपलें कीं निघून जात. त्यांत ब्राह्मण रूपानें एक वानर येऊन कांहीं खावयास मागे. तीन दिवस सत्तूचा गोळा दिला. हे हनुमान असतील त्यांचे चरण धरावे असा दामोदर स्वामीचे मनांत विचार आला. पण त्यानंतर तो ब्राह्मण किंवा तीन वानर कोणीच आले नाहीं स्वामींस अनुताप वाटला व ते स्थान सोडून दुसरें वनांत निघून गेले. फिरत फिरत गुजराथ देशांत अबूचे पहाडांत वास्तव्य केलें. रात्र वृक्षावर बसून काढावी. याप्रमाणें बार मास त्या अरण्यांत भटकत होते. एके दिवशीं एका ऋषीची गांठ पडली. त्यांनीं तूं कोण ? व कहा चला असे ललकारलें. दामोदरस्वामी दचकले व भीत भीत म्हणाले, किमीया घेणेस जातों. कलियुगांत हरिनाम हीच किमीया आहे असें म्हणून ऋषि गुप्त झाले. नाम किमिया घेऊन ते तापीतिरीं सुरतेस आले. तेथें गुरू भेटले संन्यास दिक्षा दिली. जडोन्मत्त पिशाच्च वृत्तींत एका भक्तानें नादोद गांवीं नेलें व मठ बांधून दिला. परस्त्रीकडे अशा स्थितींत लक्ष गेलें म्हणून देवापुढें दोन सुया घेऊन बसले व देवाची क्षमा मागून दोन्ही डोळे फोडून घेतले. एका झोपाळ्यावर बसून कथा श्रवण करीत कुकुरमुंड्याचे खंडोजीमहाराज यास सर्वस्व अर्पण करून त्यांचेवर कृपा केली. हेहि मोठे अधिकारी संत होऊन गेले. १८८६ चे सुमारास लेखकाचे वडील कै. दादासाहेब जवारकर हे मामलेदार असतां त्यांचेवर खंडोजी महाराजांची पूर्ण कृपा होती. त्यांची सही असलेली दोन पत्रें लेखकानें नीट सांभाळून ठेवली आहेत. हे नरसी मेहेताचे अवतार समजले जातात. यांचेनंतर संतोजी महाराज हेहि मोठे अधिकारी संत हल्लीं विद्यमान आहेत. त्यांनीं धर्मनिर्णय ग्रंथ मोठे परिश्रम घेऊन प्रसिद्ध केला आहे.

# नामदेवांची वाणी

अनुवादक : **गणेश विष्णु कविटकर**, एम्. ए.

: ११ :

## हमारे तीरथ कवन करे

आमच्या तीर्थक्षेत्राला कोण जाईल? घटकेंत गंगा व घटकेंत यमुना ह्याप्रमाणें भटकत कोण फिरेल? जप, तप, नियम करून करून थकलो पण ह्यांनीं कांहींच कार्यभाग झाला नाहीं. म्हणून आतां सर्वसंग त्याग करून बैरागी झालो. पण आनंद किंवा सिद्धि मिळाली नाहीं. वेद, पुराण व स्मृति सर्व पाठ केले पण केवळ अक्षरावरचें प्रेम वाढलें. म्हणून नामदेवानें शरीरांत, सर्व तीर्थे, गंगा-यमुना ज्यांत आहेत अशा सागरांत क्षणभर डुबकी मारली.

: १२ :

## नहीं नहीं रे हरिनाम समान

अरे! परमेश्वर नामाची बरोबरी करील असें दुसरें साधन नाहीं. हातांत तुळसी-माळा घेऊन व मुखानें रामनाम घेत गणिका विमान मार्गे वैकुंठाला गेली. म्हणून हरिभजन कर. पंचाग्नि साधनाच्या तपानें अगर शून्य समाधीनें देखील पृथ्वी आणि आकाश यांचा प्राणाशीं असलेला संबंध टाळतां टळत नाहीं. कारण, ही साधनें करीत असतां मनांत नाना संकल्प आणि विकल्प उत्पन्न होतात आणि भूतभविष्याची जाणीव असते. वेद पुराणें कंठस्थ आणि मुखोद्गत केलींस, पुनर्जन्म नको म्हणून काशीला जाऊन जल-समाधि घेतलीस, हिमालय पर्वतावर जाऊन अनेक वेळां आलास देहाची तुला करून दान केलेंस, चिरकाल जगांत वावें म्हणून कायाकल्प केलास किंवा कांहीं न खातां पितां असाच राहिलास दशमद्वारांतून वा ब्रह्म-रंध्रांतून प्राण चढविलास, सर्व पृथ्वीवर पदयात्रा करून आलास कोट्यावधि यज्ञांत लाखों करोडो रुपयांचे दान केलेंस तरी हीं साधनें परमेश्वरनामाची बरोबरी करूं शकत नाहींत. सद्गुरु ज्यावर कृपा करतात त्याच्या अंतःकरणांत परमात्म्याविषयीं प्रेमभक्ति उत्पन्न होते. कलियुगांत नामसंकीर्तन हेंच एक साधन आहे. म्हणून नामदेव त्या भगवंताचे स्मरण करतात.

: १३ :

## भगति भला बाबा काढला

वा! साधु लोकांनीं किती सुंदर भक्तिमार्ग शोधून काढला आहे! तरीपण लोक निष्ठा वा विश्वास न ठेवतांच दगडाची पूजा करतात, स्नानसंध्यादि कर्में करतात,

तुळशीच्या माळा घालतात; नाक, डोळे वगैरे स्वच्छ धुतात पण त्यांचें हृदय मात्र कोळशासारखे काळे असते. नामदेव म्हणतात, हा प्रकार आंत लाल किडे असलेल्या काशीफळापासून केलेल्या मिठाईवर खजुराचे लहान लहान तुकडे ठेवून शोभायमान केलेल्या ताटाप्रमाणें आहे.

: १४ :


## हिरदै माला हिरदै गोपाला

माझ्या हृदयांतच सृष्टीचा पालनकर्ता गोपाळ बसलेला आहे आणि माझ्या हृदयांतच त्याला माला घातलेली आहे. माझ्या हृदयांतच रंग व त्याची पडछाया आहे. माझ्या हृदयांतच त्याच्या भक्तीचा दीपक तेवत असून त्यामुळें हा घट ( शरीर ) प्रकाशमान आहे. त्याच्यामुळेंच अज्ञानरूपी दरवाजे तुटून पडले व ज्ञानाचा प्रकाश सगळ्या ठिकाणीं पसरला आहे. राममय झालेल्या हृदयाचा रंग कांहीं केल्या जात नाहीं. रामरंगीं आसक्त झालेला हा नामदेव त्या प्रभूला जाणतो.

———

## विशेष सहकार्याबद्दल महावस्त्रें

श्रीसाईनाथ हॉस्पिटलचें उद्घाटन झालें त्यावेळीं अध्यक्ष ना. मुधोळकर यांचे हस्तें, पुढील तिघांस त्यांच्या विशेष कामगिरीबद्दल श्रीसाईबाबांचा प्रसाद या नात्यानें महावस्त्रें व नारळ देण्यांत आलेः— ( १ ) वालजीभाई गज्जर, प्रो. नवजीवन कन्स्ट्रक्शन कंपनी; ( २ ) एस्. एच्. गोडबोले– आर्किटेक्ट; ( ३ ) श्री. शहाडे– विजेचे कंत्राटदार.

दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :—DIVYANETRA
शिसा ऑप्टिशिअन्स (BOM. DADAR)

[ चष्म्यांचे व्यापारी ]
यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून
उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.
छबिलदास रोड, दादर (W. R.), मुंबई २८




# एप्रिल १९६४

या महिन्यांत भक्तांची गर्दी बरीच होती. कांहीं कलाकारांनी श्रीपुढें हजेरी दिली.

**कीर्तन**:—श्री. ह. भ. प. मनोहर वासुदेव कोकलेगांवकर, कर्वेरोड आयुर्वेद रसशाळा पुणें, सं. गवई श्री. मराठे यांचे एकादशी निमित्त कीर्तन झालें. ह. भ. प. मधुकर बुवाचा पनाईकर पंढरपूर, कीर्तन.

**गायन**:—सौ. निलाबाई प्रभु-मुंबई, श्री. जयश्री चांदेरकर धुळें, श्री. कृष्णाजी निसाळ कोपरगांव; श्री. अंबादास नागरे कोपरगांव, श्री. शेख इस्माईल सई, श्री. शंकरराव दिवेकर पिंपळवाडी; श्री. मधुकर दिवेकर पिंपळवाडी; सौ. रमाबाई कुलकर्णी नगर, सौ. प्रभावतीबाई जामगांवकर शिर्डी, कुमारी मंदाकिनी देशपांडे श्रीगोंदे (नगर) श्री. दिगंबरराव भातोडे राहता; कुमार रमेश वाढणे राहता, श्री. बळवंतराव चव्हाण बडोदा, श्रीशिवचरण गोसावी निमगांव, श्री. तिपण्णा गोपण्णा म्याडमो सोलापूर, श्री. केरूमेन निमगांव, श्री. शिवराम खडांगणे, कोपरगांव श्री. भीमराव तांबे, लक्ष्मी वाडी, श्री. प्रभाकर नारायण जोशी, घोटी ताइगतपुरी (नाशिक), श्री. रामचंद्र शेळके अहमदनगर, श्री. रामचंद्र कुळकर्णी निमगांव, श्री. सखाराम विडये, अस्तगांव, श्री. व्ही. व्ही. मांजरेकर, शिर्डी, श्री. ज्ञानेश्वर वैद्य, सिन्नर (नाशिक), श्री. साईदास मराठे शिर्डी.

**नृत्य**:—कुमारी लता कुलकर्णी नगर, कुमारी प्रतिभा कुलकर्णी नगर, कुमार गोविंद रामचंद्र साळवे मुंबई.

**लोकनाट्य**:—श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर, श्री. तुकाराम खेडकर मु. खेड.

**सतारवादन**:—श्री. नरसैय्या ११९४ मोदीखाना पुणें १.

**हार्मोनियम वादन**:—श्री. शेख नबाब उमरपटेल अस्तगाव (कोपरगांव)

**तबला वादन**:—श्री. श्री. मा. कुलकर्णी निघोज (कोपरगांव), श्री. शंकर राघू सालकर, श्री. सखाराम राघु सालकर कोपरगांवकर, श्री. गुरुदत्त वाकोरी.

**नकला :**—श्री. सदाशिव नारायण कामत मुंबई २७.

**लेजिम पथक :**—सेंट्रल रेल्वे वेलफेअर सेंटर मुंबई नं. १३

**बँडपथक :**—राजुरी ( तांबा ) बीड बँडपथक दादाराव तात्याराव टिळक राजुरी ( पाटोदा )

**महागाई वाढ :**—संस्थान नोकरांना दहा रुपये ( महागाईत ) वाढ देणेंत आली आहे.

---

## श्रीरामनवमी उत्सव, शिर्डी
### ( शके १८८६ )

श्रीसच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईबाबामहाराज, मु. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनर यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणें मिति चैत्र शु. ८ दिनांक १९–४–६४ रविवार ते चैत्र शु. १० दिनांक २१–४–६४ मंगळवारपर्यंत तीन दिवस श्रींचे समाधी मंदिरांत साजरा झाला.

यंदाचे सालीं उत्सवास भक्तांची गर्दी थोडीशी कमी प्रमाणांत होती. उत्सवास मुंबई, पुणें, नागपूर, मराठवाडा, मद्रासप्रांत, म्हैसूरप्रांत, खानदेश, वऱ्हाड वगैरे ठिकाणाहून बरेंच भक्त कुटुंबांतील मंडळीसह आले होते. या वर्षी खेडूत वर्ग म्हणजे शिर्डीचे आसपासचे लोक कमी आले होते.

उत्सवाकरितां मुद्दाम साई संस्थानकडून मांडव, ध्वजपताका, कमानी, साफसफाई रंगरंगोटी पिण्याचें पाणी, राहण्याची वगैरे व्यवस्था उत्तम ठेवण्यांत आली होती.

**उत्सवाचा कार्यक्रम**

चैत्र शु. ८ दिनांक १९।४।६४ रविवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त पहाटे ६ वाजतां श्रींचे फोटोची व पोथीची मिरवणूक मंदिरांतून द्वारकामाईत भव्य चांदीचें सिंहासन ठेवून येथें २४ तास नामगजर व साई सच्चरितपारायण सुरूं झालें. दुपारीं ५ ते ७ पर्यंत ह. भ. प. अनंतराव आठवले यांचें कीर्तन व रात्रौ श्रींचे पालखींची गांवांतून मिरवणूक ब्यॅांड सुर सनई चौघडा टाळ दिंडीसह झाली.

चैत्र शु. ९ दिनांक २०।४।६४ सोमवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे फोटोची मिरवणूक द्वारकामाईतून परत मंदिरांत ६ ते ७ पर्यंत आली. नंतर गंगा-गोदावरीची कावडीची मिरवणूक होऊन त्या कावडीची पूजाअर्चा करून त्या श्रींचे

समाधीवर घातल्या गेल्या. नंतर श्रींचें मंगल स्नान, वस्त्रार्पण, पुष्पार्पण व भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजा वगैरे झाल्या.

११ ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले पुणें यांचें श्रीरामजन्मोत्सव कीर्तन झालें. नंतर माध्यान आरती, तीर्थप्रसाद. सायंकाळीं ६ ते ७ पर्यंत निशाणाची व श्रींचे रथाची मिरवणूक झाली. रात्रौ ११ वाजतां (संदल फात्या) पूजा झाली. रात्रौ शोभेचें दारूकाम व रात्रभर कलाकारांच्या गायन वादन हजेऱ्या. सकाळीं रात्रीं ९ ते ६॥ पर्यंत भक्तांच्या दर्शनासाठीं देऊळ उघडें ठेवलें होतें.

चैत्र शु. १० दिनांक २१–४–६४ मंगळवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सामुदायिक अभिषेक व सकाळीं १०॥ ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले, पुणें. यांचे गोपाळ काला कीर्तन दहीहंडी खेळ फुगड्या वगैरे झाले. नंतर माध्यान आरती तीर्थप्रसाद, रात्रौ ७ ते ८ पर्यंत साकुरी कन्याकुमारी यांचे भजन व श्री. जगन्नाथबुवा सुरतकर गवई यांचे शास्त्रीय गायन होऊन उत्सव समाप्त. उत्सवाचे तीन दिवस श्रींचे जुन्या कापडाची लिलाव रुपानें विक्री करण्यांत आली. उत्सवांत गर्दी अतिशय होते म्हणून पोलीस बंदोबस्ताकरितां मुद्दाम स्वयंसेवक दल पोलीस दल स्त्रीपोलीस ठेवण्यांत आल्यामुळें व्यवस्था चांगली राहिली. तसेंच रोगराई होऊं नये म्हणून सॅनिटेशन खात्यातर्फे पिण्याचे पाणी औषध टाकून स्वच्छ ठेवण्यांत आलें होतें. उत्सवाचे दिवशीं सन्माननीय पाहुणे नामदार राजाराम बापू पाटील (महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य) श्रींचे दर्शन घेऊन गेले. उत्सवानिमित्त प्रसिद्ध मल्लांच्या कुस्त्यांचे फड मोठ्या प्रमाणांत झाले, मल्लांना बक्षीसे देण्यांत आली. वरील सर्व व्यवस्था साई संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. दर्पसाहेब यांनीं ठेवली होती. रामनवमीनिमित्त सर्व नोकर मंडळीस चहाफराळ तीन दिवस देण्यांत आला.

---

## श्रद्धांजलि !

स्वतंत्र भारताचे प्रारंभापासूनचे लोकप्रिय पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या निधनानें भारतच नव्हे तर सारें जग पोरकें झालें आहे. भारतवासीयांची कसोटीची ही वेळ आहे. या कसोटींतून पार पडण्याचें सामर्थ्य श्रीसाईबाबा सर्वांना देवोत. पंडीतजींच्या पुण्यस्मृतीस आमचे कोटि कोटी प्रणाम !

# शिर्डी वाचनालय


शिर्डी येथील श्रीसाईनाथ वाचनालयास श्री. नारायण शिवराम अण्णाकर यांचे-कडून कै. ललितबाला नारायण हिच्या स्मरणार्थ पुढील पुस्तकें भेटीदाखल देण्यांत आली असून त्याचा साभार स्वीकार करण्यांत येत आहे :—

| पुस्तकाचें नांव | ग्रंथकर्ता |
|---|---|
| १ सावळ्या तांडेल | नाथमाधव |
| २ धडपडणारी मुलें १–३ | साने गुरुजी |
| ३ मिरी | ,, ,, |
| ४ मी | ना. ह. आपटे |
| ५ स्मृती लहरी | वा. म. जोशी |
| ६ श्याम | साने गुरुजी |
| ७ गुंजगोष्टी | ना. सी. फडके |
| ८ अशोक आणि त्याचे लेख | गुंडोपंत हरीभक्त |
| ९ चंदू | खानवेलकर |
| १० आस्तिक | साने गुरुजी |
| ११ साखरपुंडा | प्र. के. अत्रे |
| १२ अमोल आहेर | सौ. मालती दांडेकर |
| १३ सडकावरला अंकूर | ताम्हणकर |
| १४ आपण सारे भाऊ | साने गुरुजी |
| १५ गोट्या | ताम्हणकर |

१६ जाजुचे फुटाणे
१७ मन्या व बन्या
१८ मडक्यातला न्याय
१९ नीतिकथा
२० टालस्टायच्या बालकथा
२१ ध्रुव चरित्र
२२ वाघाची मावशी
२३ बाळसंवाद
२४ गोष्टींचा तास
२५ अकलेचा कांदा
२६ हास्य कथा
२७ छोटा दाजी
२८ चिमुकली दिवाळी
२९ Essays on popular scince
३० Blackmail on war
३१ Animals of yesterday
३२ Aeimals round the year
३३ Reptiles
३४ Birds
३५ Clinekles
३६ Insect parade
३७ Animals that live together
३८ Animals travels.

बाकीची पुस्तकें वाचनालयास उपयुक्त नसल्यानें परत केली आहेत.

# श्रीसाईनाथ हॉस्पिटलचा भव्य उद्घाटन समारंभ



शिर्डी येथें श्रीसाईनाथ हॉस्पिटलचा उद्घाटन समारंभ गुरुवार ता. १४ मे १९६४ रोजीं सकाळीं १० वाजतां महाराष्ट्र राज्याचें अर्थमंत्री ना. शेषराव वानखेडे यांच्या हस्ते, सुप्रीम कोर्टाचे जज्ज ना. न्या. जे. आर्. मुधोळकर यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटामाटानें व अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. त्यावेळीं घेतलेल्या छाया चित्रांत उभे असलेले श्री. त्रिलोकेकर जॉईन्ट चॅरिटी कामिशनर महाराष्ट्र स्टेट, सौ. वानखेडे, श्री. वानखेडे, सौ. मुधोळकर व श्री. मुधोळकर.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.


मुद्रक : श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४